| | |
|---|---|
| ०९ | मराठी साहित्य परिषद या प्रथितयश संस्थेस मराठी भाषा साहित्य क्षेत्राच्या वृध्दीसाठी सावेडी उपनगर भागातील , नगररचना योजना क्र.४, अंतिम भुखंड क्र.२७८ या जागेच्या मंजुर रेखांकनातील मधील खुली जागा क्षेत्र ४१८.१७ चौ.मी. या जागेवर मराठी वाचनालय विकसित करणेसाठी परवानगी देणेबाबत |
| १० | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०४ / ०६ /२०२१.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१ प्रस्ताव क्रमांक : ०१ दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मागील दिनांक ०२/०८/२०१८, ०८/०३/२०१९, २५/०६/२०१९, १६/०७/२०१९, १४/०८/२०१९, १३/०९/२०१९, २२/१०/२०१९, २९/०७/२०२०, १९/१०/२०२०, ०८/१२/२०२०, ३०/०३/२०२१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

मागील दिनांक ०२/०८/२०१८, ०८/०३/२०१९, २५/०६/२०१९, १६/०७/२०१९, १४/०८/ २०१९, १३/०९/२०१९, २२/१०/२०१९, २९/०७/२०२०, १९/१०/२०२०, ०८/१२/२०२०, ३०/०३/२०२१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** विषय पत्रिकेवरील विषय वाचा.

विषय क्रमांक १ चे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कोरोना लाटे मध्ये जिल्हयातील देशातील नागरिक मृत्यू पावले त्यांना श्रंध्दांजलीसाठी दोन मिनीटे उभे रहावे. कोरोना बाबत दिवसरात्र काम करुन पेशंटला उभे राहण्यासाठी भरपूर कार्य मा.महापौर यांनी केले आहे. मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांचा उद्या वाढदिवस आहे त्यांना दिर्घायुष्यासाठी शुभेच्छा ते दिवसरात्र काम करीत असतात. मागील जे इतिवृत्त दुरुस्तीसह ते मंजूर करावे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** रुग्णांचे बील मोठया प्रमाणात घेतले. नोटीस हॉस्पीटलला दिल्या संबंधी काही कारवाई केली. मागच्या वेळच्या बीले रुग्णांना परत गेलेले नाही त्याबाबत माहिती द्यावी.

**मा.महापौर साहेब :-** थोडया वेळात माहिती द्या. हा अजेंडयावरील विषय नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सेवाकाळात १६ महिन्यात अनेक जणांना प्राण गमवावे लागले ज्या लोकांनी यासाठी काम केले त्यांना अडचणी येत आहेत. एनयुएचएम व आरसीएच विभागात कंत्राटी कर्मचारी आहेत. हे कर्मचारी १० - १२ वर्षापासुन काम करतात जर कोरोना काळात अडचण चालू आहे. फ्रंटलाईन वर्कर म्हणून काम केले आहे. मोठे योगदान दिले आहे. त्यांना २००००/- पूढे पगार नाही. वयही भरपूर झाले आहे. दुसरीकडे त्यांना नोकरी भेटणार नाही. मा.राजेशजी टोपे साहेब यांनी आरोग्य विभागात पदांच्या भरतीचे नियोजन बाबत जाहीर केले आहे. सध्या कार्यरत कर्मचा-यांना कायम करण्याकरीता महानगरपालिकेने परवानगी मागीतलीतर मिळेल. लवकरात लवकर हा प्रस्ताव मा.महासभेपुढे घेवून हे कर्मचारी कायम झाले पाहीजे. आपण अनेक केंद्रावर भेटी दिल्या त्या केंद्रावर गर्दी असतांना स्वत: जीव धोक्यात टाकुन ते काम करतात.

**मा.महापौर साहेब :-** अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न मांडला आहे. नक्कीच आपण या संदर्भात चांगला निर्णय महासभेत घेवू.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कंत्राटी कर्मचा-यांना कवच मिळाव्यात अशी त्या कर्मचा-यांची मागणी आहे.

**मा.महापौर साहेब :-** सुरक्षा कवच बाबत लवकर कार्यवाही करा.

**मा.श्रीमती.सुनिता कोतकर :-** आरोग्य सेवा केंद्र आहे. पालिकेचे १५ वर्षापासुन चालू आहे. त्यांना अजुन नियमीत करुन घेतले नाही. त्यांना नियमीत करुन घेणेत यावे. सगळया रुग्णांची सुविधा नाही. सर्व प्रसुती केंद्र चालू करावे. डॉक्टर एकच आहेत नर्स नाहीत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आयुक्त साहेब या शहरात कोरोना काळात काम करतात. आपण जो लसीकरण कार्यक्रम राबवता आतापर्यंत लस किती आल्या. किती नागरिकांना लस दिल्या याची माहिती द्या.

**मा.महापौर साहेब :-** उत्तर मिळेल. संबंधित अधिका-यास माहिती द्यायला सांगा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कोव्हीड मध्ये सर्व स्टाफने काम केले कंत्राटी कर्मचा-यांना कायम करुन घ्यावे. कोव्हीड काळात कॉन्ट्रॅक्ट ट्रेसींग, अर्सेनीक गोळया वाटपचे काम केले. महापौर, आमदार, आयुक्त साहेब यांनी केलेल्या कामामुळे नगर शहराचा कोरोना पेशंटचा आकडा कमी झाला. कंत्राटी कर्मचा-यांना लवकरात लवकर कायम करुन घेतले तर चांगले होईल. पिंपरी चिंचवड मध्ये असा स्टाफ कायम केला महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड, परभणी येथुन माहिती महानगरपालिकेस मिळेल ती घ्यावी. कमी पगारात चांगले काम केले त्यांचे अभिनंदन केले पाहीजे. मा.आमदार, मा.महापौर, मा.आयुक्त यांचे अभिनंदन केले पाहीजे. मा.आमदार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा. डॉ.बोरगेवर सध्या काय कार्यवाही केली.

**मा.महापौर साहेब :-** माहिती द्यायला लावतो.

**मा.श्रीमती.सोनाली चितळे :-** आरसीएच व एनयुएलएम विभागाकडील विविध पदावर काम करणा-या कर्मचा-यांना कायम सेवेत सामावून घ्यावे. फरकही त्यांना द्यावा. प्रशासनाने प्रस्ताव लवकर तयार करावा.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** अनेकांनी यापुर्वी कंत्राटी आरोग्य कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेत कायम करणेबाबत मागणी केली आहे. अनेकांनी गेल्या १ ते दीड वर्षापासून कमी पगारात स्वतःचा जीव धोक्यात घालून काम केले आहे. कर्मचा-यांना कायम करण्याबाबत राज्य तसेच केंद्र शासनाने शासन निर्णय पारीत केला आहे. त्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घ्यावे असा निर्णय झाला आहे. आपल्या महानगरपालिकेतही सकारात्मक निर्णय घेवून कोव्हीड काळात काम केलेल्या कर्मचा-यांना कायम स्वरुपी महानगरपालिका सेवेत सामावून घ्यावे. अशी मी मागणी करीत आहे. महानगरपालिकेची वृक्षप्राधिकरण समिती नुकतीच जाहीर झाली. वृक्षारोपणाच्या बाबतीत कुमार भाउ वाकळे, गणेश भोसले, संपत बारस्कर यांचे योगदान खुप आहे. त्यांना या समितीचे सदस्य म्हणुन घ्यायला पाहीजे होते. वृक्षप्राधिकरण समितीतील सदस्य संख्या वाढविण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** आपल्या मागणीनुसार विचार करण्यांत येईल.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** आम्ही कमिटीत आलो. आम्ही काम चांगले केले आहे. काही विषय पक्षीय असतात.

**मा.श्री.गणेश भोसले :-** कमिटी आहे तशीच ठेवा. माझे नांव सूचविले त्याबद्दल धन्यवाद. नियुक्त वृक्ष प्राधिकरण समितीने पुढच्या काळात चांगले काम करावे. त्यांना मी शुभेच्छा देतो.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** कंत्राटी कामगारांना कायम करण्याच्या विषयास मी अनुमोदन देतो त्यांना कायम करण्यांत यावे. यापुर्वी ज्या कमिटया नेमण्यांत आल्या त्यातुन आम्हाला वगळण्यांत आले. आम्हालाही कमिटीत काम करण्याची संधी द्यावी.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आता भागानगरे, बारस्कर यांनी जो विषय मांडला केंद्राची व राज्याची योजना आहे त्यातुन मानधन देतो. कायम स्वरुपी या योजनेतुन व अनुदान मिळणार का म्हणजे त्यांना कायम करता येईल.

**मा.महापौर साहेब :-** माहिती घेवून द्या.

**मा.आयुक्त साहेब :-** यापुर्वी सदस्यांनी लसीकरणाबाबत प्रश्न उपस्थित केले. आपले लसीकरणासाठी ८ मुख्य केंद्र मंजूर आहेत त्याठिकाणी लसीकरण करत आहोत. केंद्रनिहाय माहिती दिली. प्रत्येक सेशनला १०० चे टार्गेट होते. १८-४५ वर्षाच्या वयोगटाला आपण दुसरा डोस दिला नाही. १ लाख ६ हजार लोकांना लसीकरण झाले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १८-२५ पर्यत डोस दिले असे निदर्शनास आले असे ते बायफरगेशन करुन सांगा.

**मा.आयुक्त साहेब :-** १८-४५ - १०६९६ लोकांना लसीकरण केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कालपर्यंत किती व्हायल उपलब्ध झाल्या.

**मा.आयुक्त साहेब :-** माहिती घेवून देतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मला लेखी द्या.

**मा.आयुक्त साहेब :-** २०% लोकांचे लसीकरण झाले. स्टॉक एक दिवसही शिल्लक ठेवत नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १८-४५ पर्यंत मुदतीत बंद झाल्यानंतर दिल्या गेल्या त्यामुळे ६० वर्षाच्या लोकांना लस उपलब्ध झाल्या नाहीत. आताही केडगांव केंद्रावर ३५० नागरीक आधार कार्ड घेवून उभे आहेत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** १८-४५ लोकांना व्हॅक्सीन देण्यांत आले आहे. हेल्थवर्कर, फ्रंट लाईनच रेकॉर्ड ठेवतो का. १६-१८ वयोगटातील फ्रंटलाईन, हेल्थवर्कर आहेत का ?

**मा.श्री.अविनाश घुले :-** हमाल पंचायती मधील १८ वर्षावरील आधार कार्ड मागवून लसीकरण केले आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** हेल्थवर्कर व फ्रंटलाईन वर्कर यांचे काय कागदपत्र जमा करुन घेतो.

**मा.महापौर साहेब :-** तुम्ही कमिटीवर आहात तुम्हीच घ्या आकडे भेटतील.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** अजेंडयावरील विषय घ्या.

**मा.श्रीमती.सुरेखा कदम :-** नगरची लोकसंख्या ५ लाख आहे. मा.शासनाच्या गाईड लाईन प्रमाणे ५० हजार लोकसंख्ये मागे १ केंद्र असावे. ७ आरोग्य केंद्र आहे. माळीवाडयातील उपकेंद्र बंद केले. त्याठिकाणी बसायला जागा नाही. शिवाजीनगर, वारुळाचा मारुती, स्टेशनरोड, सावेडी भागात ५-६ उपकेंद्र स्थापन करावे.

**मा.महापौर साहेब :-** माहिती घेवून सांगतो.

**मा.श्रीमती.रुपाली पारगे :-** कोव्हीड काळात नर्सेसनी काम केले त्यांना कायम करा. वायरमन यांनी सुध्दा कोरोना काळात काम केले त्यांनाही कायम करा. कोठी भागात लसीकरण झाले पाहीजे.

**मा.श्रीमती.सुरेखा कदम :-** पहिल्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. राजुरकरांना उत्तर द्यायला सांगा. लोकसंख्येच्या हिशोबाने ७ केंद्र योग्य आहेत काय ? उपकेंद्र लवकरात लवकर चालू करावे. आरोग्य केंद्र छोटे आहे. माळीवाडयात रस्त्यावर लोक उभे राहतात.

**डॉ.श्री.राजुरकर, आरोग्य अधिकारी :-** ७ युपीएससी नागरी आरोग्य केंद्र आहेत. ८ लसीकरण केंद्र आहेत. मध्ये आपण काही उपकेंद्रावर लस देण्याचा निर्णय घेतला पण लस उपलब्ध होत नसल्यामुळे उपकेंद्र बंद केले. काल १२०० लसी मिळाल्या. आजपण २२०० लसी मिळणार आहेत. आरोग्य केंद्रात १००-१५० लस देतो. २९ तारखेनंतर मा.पंतप्रधानांनी जाहीर केले. १८ वर्षावरील लसीकरणाचा निर्णय घेतला आहे. लस उपलब्ध झाल्या की सर्वांनी मिळून उपकेंद्रा बाबत निर्णय घेता येईल.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** कमी लसी शहराला मिळत आहे. केंद्र सरकार लस पुरवठा करत आहे. उपकेंद्र भविष्यात करु पालिकेच्या अशा इमारती पहा. नगरसेवकांचा हस्तक्षेप नको कोणत्याही पक्षाचा हस्क्षेप नको. कॉम्पीटीशनचा विषय निर्माण झाला आहे. महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर यांनी सरकारी ठिकाणी केंद्र सुरु करावे. सामान्य जनता लसीकरणापासून दूर जात आहेत. पुढा-यांचा हस्तक्षेप नसणार आहे, असे केंद्र निश्चीत करा. दुसरा विषय असा अशोका हॉटेल मागे ४०-५० वर्षापूर्वीचे झाड तोडले जातात तुम्ही काय ॲक्शन घेतली.

**मा.आयुक्त साहेब :-** तक्रार आली आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** नोटीस दिली. ५ हजार रुपये दंड केला.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** ५ हजारात फरक पडत नाही.

**मा.महापौर साहेब :-** अजुन काही कडक कारवाई करता आली तर करा.

**मा.श्रीमती.सुरेखा कदम :-** तिसरी लाट लहान मुलांसाठी आहे. महानगरपालिकेचे यावर काय नियोजन आहे. प्रायव्हेट हॉस्पीटल महानगरपालिकेने टाय अप करावे. काही तरी उपाययोजना करा. लहान मुलांसाठी व्हॅक्सीन उपलब्ध नाही.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्रीमती.शेळके मॅडम :-** इंम्पीरियल चौकात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, मार्केटयार्ड चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा यांची उंची वाढवावी. उड्डाणपुलाच्या कामामुळे त्यावर धूळ बसणार आहे. पुतळयाची विटंबना होता कामा नये. नर्स, डॉक्टर, ऑषध निर्माता यांनी जीवावर उदार होवून काम केले आहे. त्याना मानधनावर घेवून काम द्यावे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** मागील वर्षी ५७ कोटी वसुली केली. ७० कोटी या मार्च एण्ड पर्यंत वसुल होईल.

**मा.श्रीमती.आशा कराळे :-** पुरनियंत्रण रेषेखालील तक्रार केली त्याचे काय झाले.

**मा.महापौर साहेब :-** आपण पीडब्ल्यूडी अभियंत्यांना सांगीतले २-४ दिवसात होईल केले ते चुकीचे आहे.

**मा.श्रीमती.सुप्रिया जाधव :-** जे कामगार कंत्राटी पध्दतीने काम करतात त्यांना परमनंन्ट करण्यांत यावे. ही सभागृहास विनंती.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** गुलमोहर रोड पारिजात चौक इथे एक वृक्ष तोडण्यांत आला. महानगरपालिकेची अशोका हॉटेलच्या पाण्याची टाकी येथील ४०-५० वर्षापूर्वीची झाडे होती ती तोडण्यांत आली.

**मा.महापौर साहेब :-** लहारे साहेब माहिती देतील.

**मा.श्री.राजेंद्र कातोरे :-** महानगरपालिका हद्दीतुन १४ कि.मी. सीनानदी वाहते जलसंपदा विभागाने दोन्ही बाजुला पुरनियंत्रण रेषा टाकली ती शिथील करण्यासाठी महानगरपालिकेने नजीकच्या पावसाळी अधिवेशनापुर्वी प्रस्ताव पाठवावा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.राजेंद्र कातोरे :-** डी.पी.रस्ते मंजूर आहेत. जागा मालकांना टीडीआर देवून राज्य व केंद्राकडून निधी मागवावा. महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातील काम करणा-या आरोग्य सेविकांना कायम करण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**उपमहापौर श्रीमती.ढोणे मालन :-** थ्री स्टार मानांकनाकरीता सीनानदी साफसफाई करण्यांत आली. त्याबाबत मी पत्र दिले आहे. परंतु अद्याप उत्तर मिळाले नाही.

**मा.महापौर साहेब :-** संबंधीत आरोग्यअधिकारी यांनी माहिती द्यावी. उपमहापौरांनी जो प्रश्न विचारला ५ स्टार मानांकन मिळणे करीता रेल्वेस्टेशन रस्त्यावरील सीना नदीचे पात्र साफसफाई करणे केलेल्या कामाबाबतचे मी पत्र दिले होते त्यावर काय कारवाई केली असा प्रश्न विचारला त्याला डॉ.शेडाळे यांनी पुढे येवून उत्तर द्यावे. एका ठेकेदाराने जास्त बील काढले ते परत घेण्यात आले. त्या ठेकेदारावर कारवाई केली.

**मा.उपमहापौर श्रीमती.मालन ढोणे :-** स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणा-या व अटी व शर्ती भंग करणा-या ठेकेदारास काळया यादीत टाकण्याची कारवाई कधी करणार.

**घनकचरा विभाग प्रमुख श्री.शेडाळे :-** कर्मचा-यांनी पाठवलेला रिपोर्ट माझ्या निदर्शनास आला नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** नदीनाले सफाईला जे पोकलन मशीन लावले त्याचे तासाप्रमाणे बील रेकॉर्ड केले. प्रत्यक्ष ठेकेदाराला २५ हजार दिले. अगोदर जे जुने बील रेकॉर्ड केले त्यानुसार बील दिले. मुळ चुक झाली हे मान्य आहे. तास वाढवले नाही.

**मा.उप महापौर श्रीमती.मालन ढोणे :-** असा प्रकार पुन्हा घडू नये यासाठी भ्रष्टाचा-यांना कडक शासन होण्याकरीता व महानगरपालिकेत असा प्रकार भविष्यात घडू नये. याकरीता मा.महापौर साहेब सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स या ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याच्या व जबाबदार असणा-या कर्मचा-यावर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत.

**मा.महापौर साहेब :-** संबंधित जबाबदार यांचेवर कडक कारवाई करण्यांत यावी.

**मा.उपमहापौर श्रीमती.मालन ढोणे :-** आपल्या कर्मचा-यांनी असे कृत्य केले तर भ्रष्टाचार म्हणतो.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** नाले सफाई केल्यानंतर गाळ कडेला टाकतात. तोच परत नाल्यात जातो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** छोटे नाले सफाई करतांना गाळ काढुन रस्त्याच्या बाजुला ठेवतात पुन्हा तो गटारीत जातो. ठेकेदाराला गाळ उचलण्यासाठी सांगीतले असता माझ्याकडे फक्त गाळ काढुन वर टाकण्याचे काम आहे. गाळ उचलण्यासाठी दुसरा ठेकेदार मला ट्रॅक्टर पाठवतो. आपण टेंडर काढत असतांना, त्यावेळी जो गाळ काढील त्यानेच गाळ उचलावा अशी अट असावी.

**मा.श्री.अविनाश घुले :-** ओढे नाले सफाई करतांना भिंगारनाला दरवर्षी गाळ काढुन साईडला टाकला जातो तो पुन्हा नालीत जातो तो उचलून नेलातर महानगरपालिकेचे पैसे वाया जाणार नाहीत. माती तिथेच राहते. नाल्यातून मॅन्युअली गाळ काढण्याचे काम चालू केले त्यांच्याकडून गाळ काढायचा विषय आहे. ठेकेदाराचे ११० लोक आहेत दोन महिन्याचा ठेका दिला आज लोक आले नाहीत ते लोक कुठे लावले ते कसे कळणार.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** केडगावला कधी मशीन येणार.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** एक -दोन दिवसात केडगावला मशीन येणार. आपली कालच चर्चा झाली.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ओढे नाले सुशोभिकरणासाठी मागे आपण ठराव केला महासभेत विषय घेतला.

**मा.महापौर साहेब :-** हरीत लवाद जे दंड करतात. त्या दंडाचे एकत्र पैसे जमा झाले त्यातुन हरीतपट्टी विकासासाठी नगरची निवड केली. मा.सदस्यांनी अजुन नावे सुचवले तेही घेतले. महानगरपालिकेचा फंड नाही. संबंधित अधिका-यांनी आता कोणत्या स्टेजला आहे ते सांगावे अगोदर ७ नाले घेतले होते.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** शहरातील ओढे नाले पावसाळयापूर्वी प्रमुख नाले टेंडर काढून प्रक्रिया पार पाडून १४ मे पासून साफसफाईचे काम चालू आहे. प्रमुख ओढे नाले सफाई चालू आहे.

**मा.महापौर साहेब :-** मे महिन्यामध्ये ठेका देतो मे पूर्वी काम चालू झाले पाहीजे.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** पुढच्या वर्षी लवकर काम सुरु करु कोरोनामुळे व बजेट उशीरा मंजूर झाल्याने यावर्षी ओढे नाले सफाईला उशीर झाला आहे. ओढयामध्ये वर्षभर कचरा सांडपाणी येते मैला मिश्रीत सांडपाणी असल्याने पात्रात झाडे झुडूपे वाढतात. जिथे दाट लोकवस्ती आहे त्या ठिकाणचा गाळ उचलतो. सर्व ठिकाणचा गाळ उचलून नेत नाही. त्यामध्ये गाळ व दुर्गंधी असते थोड सुकून देतो मग उचलून नेतो जिथे आवश्यकता आहे ती वाहून नेणार आहोत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** आमच्या वॉर्डातून गाळ उचलला नाही.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** अजुन तुमचा भाग घेतला नाही. आपल्या सूचनेनुसार घेण्यात येईल. दुस-या टप्प्यात केडगांव नालेगांव आहे. ते करणार आहोत.

श्री.मेहेत्रे, इंजिनियर :- एनजीटी संस्थेने दंड केला त्या संस्थांनी दंड एमपीसीबी कडे सादर केला आहे. अनुदान अजुन प्राप्त झालेले नाही. केडगांव मधील नाल्याचा विषय आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- प्रस्ताव क्रमांक १८ दिनांक १४/८/२०१९ मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत भुयारी गटार योजनेसाठी येणा-या वाढीव खर्चास मान्यता देण्यांत यावी अशी दुरूस्ती करावी तसेच सदर ठरावातील अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा व भुयारी गटर योजना राबवित असताना इतर कामे जसे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान भरपाई, रस्त्याच्या बाजूने व रस्ता क्रॉसिंग चार्जेस, रेल्वे क्रॉसिंग चार्जेस, योजना मान्यतेवेळी झालेली वाढीव जादाची रक्कम, अप्रोच रस्ते इ. तदनुषंगिक कामे जसे कलम ३८ अतिरिक्त बाबीचे प्रस्ताव (EIRL) हे मनपाच्या हिस्सामधील १४ वा वित्त आयोग कर्जाद्वारे उभारण्यात आलेला निधी व मनपा निधी यामधून खर्च करणेस मान्यता द्यावी. असा ठराव दुरूस्तीसह मंजूर करून इतिवृत्त कायम करावे. आर्किटेक्ट इंजिनियर्स, डिझायनर्स यांचे शहरात डिझाईनची कामे चालू आहेत. महानगरपालिकेच्या पॅनल वर कोण आहेत त्याची माहिती द्या.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** महानगरपालिकेच्या पॅनलवर आर्किटेक्ट १ मनोज जाधव आहेत. गेल्या अनेक वर्षापासुन एकच आहेत. मागील वर्षी जाहीर निविदा प्रसिध्द केली पण त्याला प्रतिसाद मिळाला नाही. आवश्यकतेनुसार त्यांचेकडून काम करुन घेण्यांत येते.

**मा.महापौर साहेब :-** परत एक निविदा काढा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** निविदा काढतांना आर्किटेक्ट, इंजिनिअर, इंटिरिअर डिझायनर, स्ट्रक्चरल इंजिनिअर असे घ्या.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** धर्मवीर प्रतिष्ठान प्रत्येक रविवारी शहरात स्वच्छता मोहीम राबवते. कालच रेडीओसिटीने त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. प्रतिष्ठानने पुतळे, रस्ते, उद्यान सफाई केली असे विविध

उपक्रम प्रतिष्ठानने राबवले आहेत. असे जे प्रतिष्ठान विविध उपक्रम राबवत असतील त्यांचे महानगरपालिकेने कौतुक केले पाहीजे. या प्रतिष्ठानचा गौरव व्हावा त्यांना प्रशस्ती पत्रक द्यावे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** प्रतिष्ठानच्या माध्यमातुन जिथे गरज असेल तिथे स्वतः येवून काम करतात. आपलेच ते काम करतात. संस्थांच्या अशा संघटना पुढे येतात. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप थोपटली तर त्यांचा आदर्श घेवून अनेक संघटना पुढे येतील. त्यांना प्रोत्साहन दिल्यास ते आणखी जोमाने काम करतील. महानगरपालिकेने धर्मवीर प्रतिष्ठानची टीम असेल त्यांना महानगरपालिकेत बोलावून त्यांचा सन्मान करावा. आपल्या कारकिर्दित आपण त्यांना सन्मानीत करावे. या आठवडयाभरात त्यांना बोलावून सन्मानीत करावे.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** बरेचसे ठिकाणी उद्याने त्यांनी शोधून काढली. सोशल मिडीयाने त्यांचे कौतुक केले त्यामुळे इतरांना प्रोत्साहन मिळेल. वृत्तपत्रात त्यांची दखल घेतात. स्वच्छतेच्या बाबतीत इतर संघटनांही झटून पुढे येतील.

**मा.महापौर साहेब :-** आठ दिवसात संस्थेचे पदाधिकारी यांना बोलावुन सन्मानीत करु.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** या संस्थेबरोबरच कोरोना काळात ज्या ज्या संस्थांनी लोकांनी काम केले त्यांचाही सन्मान करा.

**मा.श्री.सागर बोरुडे :-** कोरोना काळात दंडही वसुल केला. जुन्या सिध्दीबागेला रुप देण्याचे काम लहारे साहेब यांनी केले.

**मा.महापौर साहेब :-** सगळयांचा सत्कार करु.

**मा.श्री.गणेश भोसले :-** रोखीचे बील अदा करणेबाबत ठराव झाला त्याला केराची टोपली दाखवली जाते.

**उपायुक्त श्री.डांगे :-** एप्रिल-मे मध्ये घरपट्टी वसुली झाली नाही. एमएसईबी चे थकीत देयके अदा करावे लागतील.

**मा.महापौर साहेब :-** वसुली झाल्यावर कॅश करतील.

**मा.श्री.गणेश भोसले :-** काम अगोदर करा. नगरसेवकांकडे कोणी पहायला तयार नाही. बील लवकरात लवकर मार्गी लावा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** नगरसेवक निधी रोख करणे सभागृहाने अर्थ संकल्पात ठराव केला त्याची अंमलबजावणी होत नाही. वसुलीचे काम करणेचे प्रशासनाचे काम आहे. कोरोनात बराच काळ गेला शास्ती माफीची रक्कम जमा झाली ती कोठे गेली. त्यातुन नगरसेवक निधीतील बीले निघाली असती. ६-७ कोटीचा प्रश्न होता.

**उपायुक्त श्री.डांगे :-** या वर्षीची बील द्यायला सुरुवात केली एमएसईबी चे ३० कोटी, झा ली आहे ती दिल्यानंतर देवू. एमएसईबी चालू बील देतो. पैसे आल्यावर देवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** थकबाकी वर्षानुवर्षे चालू आहे. यातुन मार्ग काढावा लागेल. या लोकांना कधी देणार एक बील यातुन काढुन द्या.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** नगरसेवक निधीचा विषय आला की त्याला कात्री लागते. छोट्या मोठया गोष्ठी साठी खर्च होतो. मुरुम टाकणे, चेंबर बांधणे, नागरिकांचे कामे केली जातात.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** वृत्तपत्रात बातम्या येतात तातडीने विषय मार्गी लावा.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** मृत्यू दाखले घरपोच देण्याची व्यवस्था केली. जिल्हा भरातून लोक जुन्या महानगरपालिकेत येत आहेत. त्याठिकाणी कच-याचे ट्रॅक्टर उभे केले आहेत. इतर गाडया त्याठिकाणी लावता येत नाही. ब-याचवेळा सूचना देखील केल्या. तरी त्या ठिकाणचे ट्रॅक्टर काढायला लावणे बाबत आदेश द्यावेत. गेल्या अडीच वर्षापासुन लाईटचा प्रश्न प्रलंबित आहे. ठेकेदाराने त्यांच्या पध्दतीने निर्णय घ्यायचे कोर्टात जायचे येथुन पुढे ज्या योजना येतील त्यावेळी आपण सूचना केली तर बरे होईल. लाईटमुळे नगरसेवकांना फिरता येत नाही. आम्ही सांगायचे कुणाला. त्याकरीता स्ट्रीट लाईटचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा. एलईडीचा प्रस्ताव मंजूर होत नसेल तर महानगरपालिकेने मटेरियल मागवुन प्रश्न मार्गी लावावा. प्रश्न सुटला नाहीतर आम्हाला परत उपोषणाला बसावे लागेल. आमचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** मी जन्म मृत्यू विभागात भेट दिली. कोव्हीडच्या नियमानुसार अंत्यविधी महानगरपालिकेने केले. मध्यंतरी हा विभाग बंद होता. हॉस्पीटलचे रेकॉर्ड जे फिडींग व्हायला पाहीजे ते होत नाही. काही वेळा नाव, गांव चुकले जातात. त्यामुळे अडचणी येतात. जन्म मृत्यू विभाग सक्षम करावा. कॉम्प्युटरवर बसणारे लोक वाढवावेत. त्याठिकाणी सुशल कर्मचारी नेमावे. त्यामुळे नागरिकांचे हेलपाटे वाचतील.

**मा.महापौर साहेब :-** आपण वर्षभरात जे मृत्यूमुखी पडले असे ३००० लोकांचे घरपोच दाखले दिले. आहेत. कुठलाही दाखला प्रलंबित नाही. प्रिंट रेडी आहेत. दुरुस्तीसाठी ॲफिडेव्हीट दिले तर त्याच दिवशी दाखला कसा देता येईल ते पाहू.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** हॉस्पीटल कडून नाव चुकीचे येणार नाही. यासाठी हॉस्पीटलला सूचना देण्यांत यावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मृत्यू झालेल्या लोकांचे रेकॉर्ड हॉस्पीटल कडून महानगरपालिकेला मिळाले नाही.

**मा.महापौर साहेब :-** तशा लेखी सूचना देण्यात याव्यात. मागील इतिवृत्तास दुरुस्तीसह ही सभा मान्यता देत आहे. विषय क्रमांक २ मंजूर करण्यांत येत आहे. विषय क्रमांक ३ दिवाळी सणानिमित्त अनुदानाच्या विषयाला कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. विषय क्रमांक ४ पद्मश्री डॉ.विखे पाटील बील आकारणी ८०/- रुपयां वरुन १००/- बील आकारण्यांत यावे. विषय क्रमांक ५ श्री.उमाप यांचे वैद्यकीय खर्चाची प्रतिपुती देयक देण्यांत सभा मान्यता देत आहे. विषय क्रमांक ६ ई निविदा क्र.१४०२ सर्व्हे नंबर २१३/२, २०६/१ ब, १ अ, १ब/२/१ अनामत रक्कम रिफंड देण्यांस ही सभा मान्यता देत आहे. विषय क्रमांक ७ स्ट्रीट लाईट वॉर्ड क्रमांक ५,६ मध्ये काही मीटर बॉक्स घ्यावेत. विषय क्रमांक ८ नालेगांव स.नं.२२०,२२१ मधील मोकळी जागा आयुक्त स्तरावर मान्यता घेण्यांत यावी.

तसेच मराठी साहित्य परिषद वाचनालय तसेच नाटयगृहासाठी जागेस परवानगी देण्यांत येत आहे. इतर काही पत्रकार बांधव आहेत त्यांना सुध्दा, इतर सामाजिक संस्था असतील अर्ज मागवून त्यांना मागणीनुसार जागा द्यावी. सावेडी भागामध्ये भैय्या गंधे यांनी हॉल बांधला आहे. चालविण्यास परवानगी देण्यांत यावी.

आपल्याकडे यासाठी माणसे कोण आहेत. आपण संबंधितांना विचारले तर, बाहेरुन काम केले तर लवकर होईल असे सांगतात.

**---*---**

**ठराव :-**

प्रस्ताव क्रमांक १८ दिनांक १४/८/२०१९ मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत भुयारी गटार योजनेसाठी येणा-या वाढीव खर्चास मान्यता देण्यांत यावी अशी दुरूस्ती करावी तसेच सदर ठरावातील अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा व भुयारी गटर योजना राबवित असताना इतर कामे जसे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान भरपाई, रस्त्याच्या बाजूने व रस्ता क्रॉसिंग चार्जेस, रेल्वे क्रॉसिंग चार्जेस, योजना मान्यतेवेळी झालेली वाढीव जादाची रक्कम, अप्रोच रस्ते इ. तदनुषंगिक कामे जसे कलम ३८ अतिरिक्त बाबीचे प्रस्ताव (EIRL) हे मनपाच्या हिस्सामधील १४ वा वित्त आयोग कर्जाद्वारे उभारण्यात आलेला निधी व मनपा निधी यामधून खर्च करणेस मान्यता द्यावी. प्रस्ताव क्रमांक २८ दिनांक ३०/०३/२०२१ च्या ठरावामध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतुन सरोज पाणी टाकी ते इंडस्ट्रीयल इस्टेट पाण्याची टाकी यांना जोडणारी जलवाहीनी झेंडीगेट बाबा बंगाली ते रेव्हेन्यू कॅन्टीन ते सैनिक लॉन कोपरा दरम्यान असलेली १००० एम.एम.व्यासाची जुनी पाईपलाईन ही सीएसआरडी ते स्टेट बँक चौक ते अशोका हॉटेल दरम्यान मुख्य रस्त्याच्या बाजूने ( एम.एस.७०० एमएमची ) नविन जलवाहीनी टाकणे अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. याच ठरावातील समदनगर पाण्याची टाकी ऐवजी समर्थनगर पाण्याची टाकी अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. असा ठराव दुरूस्तीसह मंजूर करून इतिवृत्त कायम करावे.

१५ वा वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतुन मा.केंद्र शासित अमृत योजने अंतर्गत शहर भुयारी गटर योजने अंतर्गत मलशुध्दीकरण केंद्राकडे जाणारा रस्ता करण्यासाठी रक्कम रुपये ३ कोटीच्या प्रस्तावास अहमदनगर महानगरपालिका अर्थसंकल्पीय सभा सूचना क्रमांक ७ दिनांक ३०/०३/२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहु रस्ता १५ व्या वित्त आयोगा ऐवजी १४ व्या वित्त आयोगातुन करण्यास ही सभा मान्यता देत आहे. अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

प्रस्तावामधील झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील सीनानदी व भिंगार नाला बाबतची पुररेषा पाटबंधारे विभागामार्फत निश्चित करण्यांत आलेली आहे. सदर पुररेषा निश्चित करतांना पाटबंधारे विभागाने महानगरपालिकेशी संपर्क केलेला नाही. किंवा महानगरपालिकेस यापुर्वी अवगतही केलेले नाही. सदर पुररेषेमुळे सद्यस्थितीत महानगरपालिकेने विषयांकित क्षेत्रामधील अधिकृत मालमत्ता विद्यमान बांधकामे बाधीत होत आहेत. महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता वा अभिन्यास ह्या मंजूर विकास योजना व बांधकाम नियंत्रण नियमावली नुसार रहीवास विभागामधील असुन अधिकृत मंजुर अभिन्यासातील (अंतिम मंजुर) व अकृषीक झालेल्या असुन यामध्ये मोठया प्रमाणात अधिकृत विकास झालेला आहे. व तो विद्यमान आहे. तेंव्हा ह्या सर्व बाबी पाहता पाटबंधारे विभागाने दर्शविलेल्या निळया पुर रेषेमधीलअधिकृत बिनशेती रहिवासी भुखंड वा बांधकामे अधिकृत मालमत्ता असल्याने त्यांना Blue व Red Floodline बांधकाम नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार व विकास परवानगी देण्यांत यावी. ३० मीटर रुंदीच्या रस्त्याच्या पुर्वेकडील सर्व पुररेषा उठविण्यांत यावी.

तसेच याबाबत महानगरपालिकेसह प्रत्यक्षजागेवरील सर्व्हे करुन विद्यमान नाला/ नदी बाबत योग्य पध्दतीने खोलीकरण, सरळीकरण नदी/नाला हद्दीवर संरक्षक भिंत याबाबत आवश्यक मार्गदर्शन सुचना / नियम निश्‍चित करुन सदर संपुर्ण क्षेत्राची पुररेषा पुन्हा तपासुन निश्‍चित करणेसाठी पाटबंधारे विभागास फेरप्रस्ताव सादर करण्यांत यावा असे सर्वानुमते ठरते. संबंधित ठेकेदारास काळया यादीत टाकण्यांत यावे.

मागील दिनांक ०२/०८/२०१८, ०८/०३/२०१९, २५/०६/२०१९, १६/०७/२०१९, १४/०८/ २०१९, १३/०९/२०१९, २२/१०/२०१९, २९/०७/२०२०, १९/१०/२०२०, ०८/१२/२०२०, ३०/०३/२०२१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करताना दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.संपत विजय बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री. रविंद्र रावसाहेब बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१ प्रस्ताव क्रमांक : ०२ दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साप्ताहीक नगरवेध दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.समाचार, साप्ताहिक लोकअंकुर, दै.लोकमंथन, साप्ताहिक नगरटाईम्स, दै.सार्वमत, साप्ताहिक पोलीस पेपर, दै.महाराष्ट्र निरोप्या, साप्ताहिक ज्ञानधारा, दै.नवामराठा, दै.पुढारी, साप्ताहिक सिटी वॉच या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या सन २०१९ या कालावधीतील एकुण ७८ बिले मा.महासभेकडे मंजूरीस्तव पाठविणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिध्दी विभागा मार्फत शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रांमध्ये रोटेशननुसार प्रसिध्द करण्यांत येतात.

साप्ताहिक नगरवेध, दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.समाचार, साप्ताहिक, लोकअंकुर, दै.लोकमंथन, दैनिक नगर टाईम्स, दै.सार्वमत, साप्ताहिक पोलीस पेपर, दै.महाराष्ट्र निरोप्या, साप्ताहीक ज्ञानधारा, दै.नवामराठा, दै.पुढारी, साप्ताहिक सिटी वॉच या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या एकुण ७८ बिले सन २०१९ या कालावधीतील आहेत.

उपरोक्त जाहीराती वेळोवेळी मा.उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्या खर्चास दिलेल्या मंजूरीने देण्यांत आलेल्या आहेत. सदर जाहिरातीची बीले शासकीय दराने प्राप्त झालेली आहेत. तरी सदर बीले जाहिरात खर्च रु.४०,००,०००/- या लेखा शिर्षकातून खर्ची घालण्यास व रु.३,४८,९०१/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख अठ्ठेचाळीस हजार नउशे एक फक्त) मंजूरी मिळावी.

सन २०२०-२०२१ लेखाशिर्षक जाहिरात खर्च बजेट तरतुद रु. ४०,००,०००/- एकुण झालेला खर्च - १७,१३,७०४/- शिल्लक रु. २२,८४,८८५/- सदर बाबत संबंधित वृत्तपत्रांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर वरीलप्रमाणे ७८ बीले चालू आर्थिक (सन २०२०-२०२१) वर्षातून खर्ची टाकणे करीता लेखा परिक्षणासाठी पाठविले असता मा.मुख्यलेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील नियम १६८ प्रमाणे मुदतवाढ मागण्या मा.महासभेची मंजुरी शिवाय देता येणार नाही. असा अभिप्राय दिला आहे. त्यानुसार सदरची बीले अदा करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेकरीता मा.महासभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

चर्चा :- चर्चा नाही.

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :-** ऑफीस रिपोर्ट मंजूर. साप्ताहीक नगरवेध दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.समाचार, साप्ताहिक लोकअंकुर, दै.लोकमंथन, साप्ताहिक नगरटाईम्स, दै.सार्वमत, साप्ताहिक पोलीस पेपर, दै.महाराष्ट्र निरोप्या,

साप्ताहिक ज्ञानधारा, दै.नवामराठा, दै.पुढारी, साप्ताहिक सिटी वॉच या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या सन २०१९ या कालावधीतील एकुण ७८ देयके अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. व प्रसिध्दी विभागामार्फत राबविण्यांत येणा-या दिनांक १०/०५/२०१६ ते दिनांक ०३/११/२०१७ अखेर सबा व्हीडीओ शुटींग ॲण्ड फोटोग्राफी यांचे व्हीडीओ शुटींगचे रक्कम रु.४८७५०/- चे व अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक ६ अ पोटनिवडणूक रक्कम रु. ४१,२५०/- चे खर्चास मान्यता देण्यांत येत आहे. व अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ राजू खरपुडे प्रेस फोटोग्राफर यांचे रक्कम रु.९०५०/- चे खर्चास मान्यता देण्यांत येत आहे. घनकचरा विभागाकडील विविध कार्यक्रम व उपक्रमांचे बील रक्कम रु.५७,०००/- व केडगांव उपविभागाकडील वर्तमान पत्राचे बीलाची रक्कम रु.१३०२३/- इत्यादी रक्कमांच्या देयके देण्यास व खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. संबंधित विभाग यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१ प्रस्ताव क्रमांक : ०३ दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०१९-२०२० दिवाळी सणानिमित्त करारनामानुसार पात्र कायम कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करुन केलेल्या खर्चाच्या प्रस्तावास मा.महासभेची कार्योत्तर मंजूरीस्तव.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :** १) अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा. क्र. ४१ / श्रमिक /२०२० दिनांक २१/०९/२०२० रोजीची संप नोटीस.

२) मा. सहाय्यक कामगार आयुक्त तथा समेट अधिकारी, औद्योगिक विवादअधिनियम, १९४७, अहमदनगर यांचेकडील जा.क्र. / सकाआ/अ.नगर /औविअ / ८५२ / २०२० दिनांक २१/०९/२०२० रोजीचे पत्र.

३) जा. क्रं. आस्था. २०५७ दिनांक १४/१०/२०२० अन्वयेचे पत्र.

४) दिनांक १६/१०/२०२० रोजीची संयुक्त बैठक.

५) दिनांक २६ /१०/२०२० रोजीची संयुक्त बैठक.

६) मा. औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम १२ (३) अन्वये मा. अधिकारी व कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये झालेला करारनामा.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचेकडील जा. क्र. ४१ / श्रमिक / २०२० दिनांक २१/०९/२०२० अन्वये औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २२ (१) नुसार संप नोटीस देऊन परिशिष्टातील मागण्यासाठी संप नोटीस देवून सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये खालील प्रमाणे मागण्या केलेल्या होत्या.

१) दि. १४/११/२०२० रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २०१९ - २० या सालासाठी त्यांच्या सर्व भत्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २०% बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यात यावा.

२) महानगरपालिकेने सर्व कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रु. २०,०००/- (अक्षरी रु. वीस हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यात यावी.

संदर्भिय संप नोटीसाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये संदर्भ क्रं. २ नुसार मा. सहाय्यक कामगार आयुक्त तथा समेट अधिकारी, अहमदनगर येथे सुनावणी होत असुन समेट कार्यवाही प्रस्तावित आहे.

प्रस्तुत विषयांकित मागणी बाबत संदर्भ क्रं. ३ नुसार जा. क्र. आस्था. २०५७ दिनांक १४/१०/२०२० अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने मा. उपायुक्त (सा) यांचे समवेत प्रशासन व मनपा कामगार युनियन प्रतिनिधी यांचेमध्ये दिनांक १६/१०/२०२० रोजी संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

तथापि सदर संयुक्त बैठकीमध्ये मा. आयुक्त यांचे समवेत संयुक्त बैठक होवून निर्णय घेणे अपेक्षित असलेबाबत मनपा कामगार युनियन यांनी मागणी केल्याने सदर बैठकीमध्ये निर्णय झालेला नव्हता.

तद्दनंतर संदर्भ क्रं. ५ नुसार दिनांक २६ / १० / २०२० रोजी विषयांकित मागणीबाबत मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये पुनश्चः संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

सदर दिनांक २६ / १० / २०२० रोजीच्या संयुक्त बैठकीमध्ये सन २०१९ - २०२० करीता दिवाळी सणानिमित्त मनपा कायम कर्मचा-यांना रु. ७,०००/- सानुग्रह अनुदान अदाबाबत निर्णय होवून मा. औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम १२ (३) अन्वये महानगरपालिका प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये खालील शर्ती व अटींवर करार करण्याचे ठरले. त्यानुसार करार करण्यात येत असुन सदर करारास मा. महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहुन उभयपक्षी मंजुरी देण्यात आली आहे. (सोबत : करारनामा छायंकित प्रत.)

**कराराच्या अटी व शर्ती**

**१.** सन २०१९ - २०२० करिता दिवाळी सणासाठी करारापुर्वी म्हणजे दि. ०२/११/२०२० पर्यंत महानगरपालिकेच्या कायमसेवेत असणा-या प्रत्येक पात्र कामगार कर्मचा-यास (परिविक्षाधीन व सन २०१९-२०२० या अर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांसह व प्रातिनियुक्तिवरील कर्मचारी यांचेसह) विनाअट एकूण प्रत्येकी रुपये ७,०००/- (अक्षरी रुपये सात हजार मात्र) सानुग्रह अनुदान म्हणुन देण्यात येतील. तथापि पात्र कायम कर्मचा-यांना त्यापैकी दिवाळीपुर्वी रु. ५,०००/- व महानगरपालिकेची कर संकलनाची टक्केवारी ५० % पेक्षा जास्त झाल्यास उर्वरित रक्कम रु. २,०००/- माहे डिसेंबर २०२० अखेर अदाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**१.** सन २०१९ - २०२० या आर्थिकवर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना तो कार्यरत असलेल्या कालावधी पर्यंतचेच सानुग्रह अनुदान देय राहील.

**२.** महाराष्ट्र शासनाने बोनस म्हणुन सन २०१९ - २०२० सालासाठी देण्याचे ठरविले किंवा सानुग्रह अनुदानाबाबत शासनाचा आक्षेप आला तर त्याबाबत युनियनशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**३.** वरील अट ही दि. २१/०९/२०२० रोजीच्या संप नोटीशीमधील परिशिष्टामध्ये नमूद सर्व मागण्यांबाबत अंतीम करार आहे. असे समजण्यात येईल, सदर करार हा सन २०१९ - २०२० साठी असुन तो पुढील काळात बंधनकारक रहाणार नाही.

**४.** हा करार महानगरपालिकेतील सर्व कार्यरत व सेवानिवृत्त कामगार कर्मचा-यांवर बंधनकारक राहील.

**५.** या कराराचा लाभ घेणा-या प्रत्येक कामगार कर्मचा-यास या सानुग्रह अनुदानातुन प्रत्येकी रू. २००/- युनियन निधी म्हणुन कपात करण्यांत येईल व ही रक्कम युनियनला धनादेशाचे स्वरूपात देण्यांत येईल. या कपातीबाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कर्मचारी युनियनची राहिल. (सोबत : करारनामा प्रत)

मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रं. २१ दिनांक १९/१०/२०२० अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२० - २०२१ या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदानाकरीता रक्कम रु. २ कोटी तरतुद करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये दि. ०२/११/२०२० रोजी अंदाजे १९०० कायम कर्मचारी असुन त्यानुषंगाने प्रत्येकी रु. ७,०००/- या प्रमाणे दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान म्हणुन देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,३३,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी तेहतीस लाख दहा हजार) इतका खर्च अपेक्षित होईल.

तरी अहमदनगर महानगरपालिका कामगार यांचेकडील जा. क्र. ४१ / श्रमीक / २०२० दिनांक २१/०९/२०२० अन्वयेची संप नोटीसाच्या अनुषंगाने दिनांक २६ / १० / २०२० रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये झालेल्या संयुक्त बैठकीमधील निर्णयानुसार मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये झालेल्या कारारनामानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त दिवाळीपुर्वी रक्कम रु. ५,०००/- व महानगरपालिकेची कर संकलनाची टक्केवारी ५० % पेक्षा जास्त झाल्यास उर्वरित रक्कम रु. २,०००/- माहे डिसेंबरमध्ये अशी एकूण रु. ७,०००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान अदाई करणेस व सदरच्या सानुग्रह अनुदानामधुन प्रत्येकी रु. २००/- याप्रमाणे कपात करुन मनपा कामगार युनियन यांना अदा करणेस तसेच सदर करारनामामध्ये नमुद केल्यानुसार सदरच्या खर्चास व प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता मा. महासभेकडेस पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-** नाही.

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर. दिवाळी सणानिमित्त अनुदानाच्या विषयाला कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका सन २०१९-२०२० दिवाळी सणानिमित्त करारनामानुसार पात्र कायम कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करुन केलेल्या खर्चाच्या प्रस्तावास ही सभा कार्योत्तर मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.मालन सुरेश ढोणे

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली अजय चितळे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१ प्रस्ताव क्रमांक : ०४ दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३४ व १३५ अन्वये विनंती अर्ज बाबत पद्मश्री.डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन विळद घाट अहमदनगर यांचे संस्थेस पाणी बील आकारणी कामी मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ - १) मा.महासभा प्रस्ताव क्र. ६० दि. २९/०३/२०१६ अन्वये पारीत अंदाजपत्रकीय ठराव. (पाणी पट्टी दरवाढ बाबत ठराव )

२) पा पु जा.क्र.१२०६ दि.३१/०१/२०१७ रोजीचे कार्यालयीन आदेश .(पाणी पट्टी दरवाढ कार्यालयीन आदेश)

३) इकडील जा.क्र. पा पु ०६ दि. ०१/०४/२०१७ रोजीचे पत्र (संस्थेस दर वाढ बाबत पत्र)

४) संचालक.आय.बी.एम.आर.डी. विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.

५) प्राचार्य.अभियांत्रिकी महाविदयालय, विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.

६) प्राचार्य.औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय विळद घाट,अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.

७) प्राचार्य.डॉं.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७

८) इकडील जा.क्र. पा पु ९७ दि. २७/०४/२०१७ रोजीचे पत्र ( पाणी पट्टी दरवाढची कमी करण्याची मागणी अन्याय केले बाबत पत्र )

९) संचालक.आय.बी.एम.आर.डी. विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७ चे पत्र.

१०) प्राचार्य.अभियांत्रिकी महाविदयालय, विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७ चे पत्र.

११)प्राचार्य.औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७ चे पत्र.

१२) प्राचार्य.डॉं.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७

१३) इकडील जा.क्र. पा पु ५६३ दि. १०/०९/२०१७ रोजीचे पत्र ( पाणी पट्टी दरवाढची कमी करण्याची मागणी अन्याय केले बाबत पत्र )

१४) इकडील पा पु जा.क्र.७१७ दि.२७/०९/२०१७ रोजीची नोटीस ( पाणी पट्टी थकबाकी रक्कम भरणे बाबत नोटीस)

१५) कोर्ट विभाग जा.क्र.१४७ दि १७/१०/२०१७ रोजीचे पत्र ( विखे पाटील कॉलेज विरूध्द महानगरपालिका अ.नगर बाबत टॅक्स अपील )

१६) इकडील पा पु जा.क्र.१४९० दि.२८/०१/२०१९ रोजी नोटीस( पाणी पट्टी थकबाकी रक्कम भरणे बाबत नोटीस)

१७) संचालक.आय.बी.एम.आर.डी. विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.

१८) प्राचार्य.अभियांत्रिकी महाविदयालय, विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.

१९) प्राचार्य.औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय विळद घाट,अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.

२०) प्राचार्य.डॉं.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७

२१) प्राचार्य.डॉं.विखे पाटील फौंडेशन, वडगांव गुप्ता विळद घाट यांचे दि.१८/०५/२०२०

२२) प्राचार्य.डॉं.विखे पाटील फौंडेशन, वडगांव गुप्ता विळद घाट यांचे दि.३०/०७/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरून विनी रिपोर्ट सादर की, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांचे १] संचालक,आय.बी.एम.आर.डी., २] प्राचार्य,अभियांत्रिकी महाविदयालय, ३] प्राचार्य,औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय, व ४] प्राचार्य डॉं.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज, या सर्व संस्थाना अहमदनगर महानगरपालिकेकडून पाणी नळ कनेक्शन घेतलेले असून रू.८०/- प्रति घन मिटर दराप्रमाणे पाणी पुरवठा केला जात होता. परंतु आपले कार्यालयाकडून दि.१/०४/२०१७ रोजी पत्र पाठवून अचानक दि.०१/०४/२०१६ ते जानेवारी २०१७ या कालावधी करिता रू.१५०/- प्रति घन मिटर या दराने पूर्वलक्षी प्रभावाने बीलाची आकारणी करून मागणी केलेली आहे. या संदर्भात संस्थेच्या वरील चारही महाविदयालयांनी आपणास दि.१२/०७/२०१७ रोजी पत्र पाठवून पूर्वीच्याच दराने म्हणजे रू.८०/- प्रति घन मिटर यादराने पाणी बील पाठविण्याची विनंती केलेली होती.

परंतु अहमदनगर महानगरपालिकेचे मा.महासभा क्र.०६ प्रस्ताव क्र. ६० दि. २९/०३/२०१६ अन्वये पारीत ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेकडून वाणिज्य वापर व औद्योगिक वापर पाणी ग्राहकांना एप्रिल २०१६ पासून पाणी पट्टी दर वाढ लागू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये वरील ग्राहकांचा समावेश आहे. सदर दरवाढ ठरावाची जानेवारी २०१७ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार वरिल पाणी ग्राहकांना वाढीव दराने पाणीपटटीची बीले देण्यात आलेले आहेत. [एप्रिल २०१६ पासून फरकासह रक्कम भरणे बाबत]

परंतू पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांनी त्यांचे अखत्यारीतील वरिल १ ते ४ नळ कनेक्शन करिता वाढीव दराने आकरण्यात आलेली पाणी पट्टी मान्य नसले बाबत दि.१०/०४/२०१७ रोजी पत्र देवून कळविले होते. त्यानुसार मा.उपायुक्त [सा] यांचे प्रशासकीय मंजूरीने त्यांची मागणी अमान्य करण्यात येत असले बाबत इकडील जा.क्र. पा.पु ९७ दि. २७/०४/२०१७ अन्वये पत्र देवून कळविण्यात आलेले आहे.

असे असतांना पुन्हा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांचे १] संचालक,आय.बी.एम.आर.डी., २] प्राचार्य,अभियांत्रिकी महाविदयालय, ३] प्राचार्य,औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय, व ४] प्राचार्य डॉं.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज, या सर्व पाणी ग्राहकांनी दि.१४/७/२०१७ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला होता. त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मंजूरीने त्यांची मागणी अमान्य करण्यात येत असले बाबत इकडील पा पु जा.क्र.५६३ दि.०१/०९/२०१७ अन्वये पत्र देवून कळविण्यात आलेले आहे.

याच अनुषंगाने परत दि.१८/०५/२०२० रोजी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांनी इकडेस पत्र देवून महानगरपालिका अधिनियम १९४९ वे कलम १३४ व १३५ अन्वये पाणी पट्टीच्या दराबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समितीचा असून संदर्भ क्र.२ अन्वये संस्थेने केलेल्या मागणीवर स्थायी समितीने निर्णय घेणे, कायदयातील तरतुदीनुसार गरजेचे व आवश्यक आहे. संस्था कुठल्याही

स्वरूपाचे व्यावसायिक अगर वाणिज्य कामकाज करत नाही.

त्यामुळे संस्थेस व्यावसायीक अगर वाणिज्य कारणाकरिता वापरण्यात येणारी पाणीपट्टी दर लागू करता येणार नाही. अशी कायदयात तरतुद आहे. तसेच कलम १३४ व १३५ अन्वये दराविषयी निर्णय घेण्याचा स्थायी समितीस अधिका आहे. परंतू प्रस्तुत प्रकरणात संस्थेने अन्वये केलेली मागणी/निवेदन निर्णयाकरिता स्थायी समितीसमोर न ठेवता मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख, महानगरपालिका यांनी मा.अतिरिक्त आयुक्त यांचे मान्यतेने परस्पर पाठवून संस्थेची वैध मागणी नाकारलेली आहे. म्हणून संस्था आपणास पुन्हा सदरील निवेदन सादर करित आहे.

**" संस्थेची विनंती की, सुधारित दराने संस्थेस आकारण्यात आलेली पाणीपट्टी व त्या अनुषंगाने संस्थेच्या वरील चारही महाविदयालयाने आपणांस दि.१०/०४/२०१७ व १२/०७/२०१७ रोजी दिलेली निवेदन विचारार्थ स्थायी समितीसमोर मांडण्यात यावे व सस्थेच्या निवेदनाचा सहानुभुतीपूर्वक विचार करून संस्थेस जुन्या दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी ही विनंती या बाबत इकडेस पुन्हा विनंती केलेली आहे. "**

**वरिल परिस्थितीती बाबत पद्मश्री डॉ.विठठलराव विखे पाटील फौडेशन अहमदनगर यांनी यापुर्वी दिलेल्या पत्र/निवेदन बाबत सस्थेनी केलेल्या जुन्या दराने म्हणजे रू.८०/- इतकी पाणी पटटी आकारणीची मागणी** मा.<u>आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मंजूरीने त्यांची मागणी अमान्य करण्यात आली बाबत त्याना वैळोवेळी कळविण्यात आलेली असन व</u> अर्थ विभाग जा.क्र.९६७ दिनांक १९/३/२०१६ अन्वये मा.महासभा क्र.०६ प्रस्ताव क्र. ६० दि.२९/०३/२०१६ अन्वये मा.स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. व त्यानुसार या विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

यास्तव वरिल सर्व बाबीचे अवलोकन करता पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांचे १] संचालक,आय.बी.एम.आर.डी., २] प्राचार्य,अभियांत्रिकी महाविदयालय, ३] प्राचार्य,औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय, व ४] प्राचार्य डॉ.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज, या सर्व वाणिज्य पाणी ग्राहकांना मा.महासभा क्र.०६ प्रस्ताव क्र. ६० दि. २९/०३/२०१६ अन्वये पारीत ठरावानुसार या विभागाकडून कार्यवाही करण्यात येत असतांना त्यांची जुन्या दराने पाणी पटटी आकरणीची मागणी विचारात घेता सदरची बाबही धोरणात्मक स्वरूपाची असल्याने या बाबत वरिष्ठ स्थरावरून निर्णय घेणे संयुक्तीक राहील.

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त संदर्भीय पत्राचे अवलोकनानुसार प्राचार्य डॉ.विखे पाटील फौंडेशनचे एकूण चार संस्थेचे एप्रिल २०१६ ते जुन २०२० अखेर मनपा मध्ये मिटरव्दारा पाणीपट्टी बाबत मा.महासभा क्र.०६ प्रस्ताव क्र.६० दिनांक २९/०३/२०१६ अन्वये मागणी केलेली प्रत्येक संस्थेची रक्कम व संस्थेने भरणा केलेली रक्कम व संस्थेकडे बाकी येणे याचा तपशिल प्रत्येक संस्थेचा स्वतंत्रा स्वरुपात तपशिल सादर करावा.

यावर लिपीक यांचेकडून मा.सादर प्राचार्य डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संस्थेने भरणा केलेल्या व उर्वरीत रक्कमेच्या तपशिल संस्थेवाईज सोबत सादर करीत आहे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सदर संस्थेच्या पाणी बिलाबाबत न्यायालयात टॅक्स अपील कोर्ट विभाग जा.क्र.१४७ दि.१७/१०/२०१७ अन्वये विखे पाटील कॉलेज विरुध्द मनपा अहमदनगर असी कैफीयत दाखल असल्याचे सोबतच्या कागदपत्रावरुन दिसुन येत आहे. तरी सदरचे उपरोक्त

बाबी व विखे फौंडेशनचे डि.व्ही.व्हीपीपीएफअसे लिगल/२०२०/६५५ दि. ३०/०७/२०२० चे पत्र यांचे न्यायालयीनदृष्टीकोनातून संपूर्ण लिगल भाग तपासने बाबत मनपा पॅनल वरील वकील यांचे स्वयंस्पष्ट कायदेशीर मत घेवून पुढील कार्यवाही करणे उचित वाटते. तरी मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, दि.१९/०३/२०२० रोजी मा.उप-आयुक्त (सा) यांचेशी सदर बाबत झालेल्या चर्चामध्ये आदेशीत केले की मा.वकीलांचे मत आपण घेवून फाईल सादर करावी.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि, यांचेकडून सादर की, सदर आदेशान्वये पॅनलवरील वकीलांचे मत तात्काळ घ्यावे व फाईल सादर करावी.

यावर लिपीक यांचेकडून मा.सादर की, विनंतीपूर्वक सादर की, प्रस्तावित प्रकरणी मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे निर्देशानुसार मनपाचे लिगल रिटेनर श्री.राजे भोसले यांना इकडील जा.क्र.शहर पा.पु.३२४ दि.२४/०८/२०२० अन्वये पत्र देवून अहवाल मागविला असता ॲड.श्री.राजेभोसले यांनी दि.२५/०८/२०२० रोजी खालील प्रमाणे अहवाल इकडेस सादर केलेला आहे.

विखे पाटील फौंडेशन यांचे विनंती प्रमाणे सदरचे प्रकरण मनपा महासभे समोर ठेवून निर्णय घेण्याचा अधिकार महासभेस आहेत. जरी विखे पाटील फौंडेशनने दाखल केलेले टॅक्स अपिल मे.कोर्टात प्रलंबित असले तरी सदर प्रकरण महासभेसमोर ठेवून त्यावर निर्णय घेता येवू शकतो. त्यास टॅक्स अपिलाची बाधा येत नाही. कारण पाणी पट्टीचे संदर्भात रक्कम कमी किंवा जादा करणेचा अधिकार महासभेस आहे. याबाबत निर्णय झ ााल्यानंतर सदर टॅक्स अपील मे.कोर्टातुन काढून घेवून तडजोडीची कार्यवाही करता येवू शकते. अशा परिस्थितीत सदर विषय महासभेत ठेवून महासभेचा निर्णय घेणे उचित राही.

तरी प्रस्तावित प्रकरणी मनपा लिगल रिटेनर ॲड.श्री.राजेभोसले यांचा अभिप्राय / अहवाल आदेशार्थ सविनय सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मनपा पॅनल वकील यांचा दिनांक २५/०३/२०२० च्या (पा.नं.१३ ) अभिप्रायानुसार सदर बिलाच्या दराबाबतचे निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य वाटते.

तथापि मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे अहवालानुसार अ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांनी विधीतज्ञांच्या अभिप्रायानुसार प्रस्तावित केल्यानुसार मा.महासभेकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, उक्त बाबत दर निश्चीत करणेबाबत तसेच -------- दर बाबत जीवन प्राधिकरणाचे आदेशाप्रमाणे सादर करणेबाबत.

यावर पाणी पुरवठा विभाग यांचेकडील दि. १७/११/२०२० रोजीचा मा.फेरसादर रिपोर्ट की, शहर पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांचे १] संचालक,आय.बी.एम.आर.डी, २] प्राचार्य,अभियांत्रिकी महाविदयालय, ३] प्राचार्य,औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय, व ४] प्राचार्य डॉ.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज, अहमदनगर या सर्व संस्थाना अहमदनगर महानगरपालिकेकडून पाणी नळ कनेक्शन घेतलेले असून रू.८०/- प्रतिघन मिटर दराप्रमाणे पाणी पुरवठा केला जात होता. परंतु आपले कार्यालयाकडून दि.१/०४/२०१७ रोजी पत्र पाठवून अचानक दि.०१/०४/२०१६ ते जानेवारी २०१७ या कालावधी करिता रू.१५०/- प्रति घन मिटर या दराने

पूर्वलक्षी प्रभावाने बीलाची आकारणी करून मागणी केलेली आहे. या संदर्भात संस्थेच्या वरील चारही महाविदयालयांनी आपणास दि.१२/०७/२०१७ रोजी पत्र पाठवून पूर्वीच्याच दराने म्हणजे रू.८०/- प्रति घन मिटर यादराने पाणी बील पाठविण्याची विनंती केलेली होती.

या अनुषंगाने या विभागाकडील सादर प्रस्तावा मध्ये दि.०८/०९/२०२० रोजी मा.आयुक्त यांनी उक्त बाबत दर निश्चित करणे बाबत तसेच हद्दी बाहेरील दरा बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची परिपत्रक प्रमाणे सादर करणे बाबत निर्देशित केलेले होते.

त्यानुसार पा.पु जा.क्र.१०४४ अन्वये पत्र देवून मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांचे दि.०२/११/२०२० रोजीचे पत्रातील मुद्दे खालिल प्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चालवित असलेल्या पाणी प्रकल्पांचीच देखभाल व दुरूस्तीसाठी लागणा-या खर्चाचे अवलोकन करून संबंधित पाणीपट्टी योजनानिहाय निश्चित केली जाते. सदर पाणी पट्टी दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालवित नसलेल्या योजनेला लागू होत नाहीत.

२. कोणत्याही योजनांची पाणी पट्टीसाठी सदर ठरवतांना सदर योजनेसाठी लागणा-या देखभाल दुरूस्ती संदर्भातील सर्व कामांचा विचारात घेवून एकुण वार्षिक देखभाल दुरूस्ती खर्च निश्चित करण्यात येतो. या संदर्भात आपले योजनेचा देखभाल दुरूस्तीचा खर्चाचा आढावा घेवून व त्या अंतर्गत लाभार्थ्यांची संख्या लक्षात घेवून योजना आर्थीकदृष्टया सक्षम होण्याठी किमान पाणीपट्टीची आकारणी दर निश्चित केला जातो. त्यामुळे प्रत्येक योजनेचा पाणी पट्टी दर हा वेगवेगळा निश्चित होतो.

३) स्तरावरून देखभाल दुरूस्तीच्या खर्चाने अवलोकन करून पाणी पट्टी दर निश्चित करण्यात यावे. या कार्यालयामार्फत पाणी पट्टी दराबाबत मार्गदर्शन हवे असल्यास सदर योजनेचा देखभाल दुरूस्तीचा खर्च, विद्युत देयके व सद्यस्थितीत आकारण्यात येत असलेली पाणी पट्टी दर इत्यादी कागदपत्रे या कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावे असे इकडेस कळविले आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याचा दृष्टीकोनातून पाणीपट्टी दरवाढ आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने सन २०१६ -२०१७ चे अंदाजपत्रकीय मा.महासभेसमोर पाणी पट्टीचे दरात वाढ करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावापैकी व्यावसायिक वापर व औदयोगिक वापराच्या पाणीपट्टीमध्ये प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार वाढ करण्यात यावी असा ठराव पारीत झालेला होता. त्यानुसार घरगुती वापर पाणी पट्टी दरवाढ वगळता व्यावसायीक वापर, औदयोगिक वापर, इत्यादीचे पाणी दरामध्ये एप्रिल २०१६ पासून दरवाढ लागू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पद्मश्री डॉ.विठ्ठराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांचे वरिल चार नळ कनेक्शन समावेश आहे.

सन २०१६ - २०१७ पासून व्यावसायीक वापर व औदयोगीक वापर पाणी पट्टी मध्ये दरवाढ लागू केलेली असतांनाही महानगरपालिकेस मोठ्याप्रमाणावर तोटा होत असल्याने व परिणामी शहर पाणी पुरवठा योजनेची वीज बील वेळेत भरणेस वांरवार अडचणी निर्माण होत आहेत.

यास्तव वरिल सर्व बाबींचे आवलोकन करता पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांचे १] संचालक,आय.बी.एम.आर.डी, २] प्राचार्य,अभियांत्रिकी महाविदयालय, ३] प्राचार्य,औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय, व ४] प्राचार्य डॉ.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज, अहमदनगर यांचे दरकमी करून पूर्वीच्याच दराने म्हणजेच रू.८०/- प्रति घन मीटर या दराने पाणी बील आकारणी करणेची केलेली मागणी विचारात घेता सदरची बाबही धोरणात्मक स्वरूपाची असल्याने व दर कमी

करणे अथवा दरवाढ करणेची बाबही मा. महासभेच्या निर्णया नुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल असे इकडील मत आहे.

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालामधील नमूद प्रमाणे २०१६-२०१७ पासुन व्यवसायीक वापर व औद्योगिक वापर पाणीपट्टी मध्ये दरवाढ लागु केली आहे.

दरवाढीचे व दराबाबत म.जी.पी.महाराष्ट्र शासन यांचेकडे संदर्भीय पत्रान्वये देण्यांत आलेले मत उपरोक्त सादर केलेले आहे.

तरी सदर दर वाढविणे किंवा कमी करणे ही धोरणात्मक असल्याने मा.महासभेमध्ये निर्णयानुसार कार्यवाही करणे संयुक्तीक वाटते. तरी सदर बाबत मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर उप.आयुक्त श्री.सचीन राउत यांचा अभिप्राय की, प्रस्तावित प्रमाणे पुढील मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, याबाबत समक्ष चर्चा करावी.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, श्री.कलोशिया मा.आयुक्त साहेब यांचेशी झालेली चर्चा प्रमाणे मा.महासभेचा ठराव क्रमांक ६० दिनांक २९/०३/२०१६ अन्वये हद्दीमध्ये व हद्दीबाहेर दरांचा तक्ता सादर करावा.

यावर लिपीक श्री.कलोशिया यांचा अभिप्राय की, सोबत महासभा ठराव क्रं. ६० पा.नं.१३७ वर सादर केला आहे व त्याची हद्दीचा चार्ट सोबत पा.नं.१३४ वर जोडला आहे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचेकडुन फेरसादर रिपोर्ट की, उपरोक्त नमूद नुसार म.न.पा ठराव क्रं. ६० दिनांक २९/०३/२०१६ अन्वये (पान नं.१३६) मुख्य जलवाहिणीवरील मीटर प्रमाणे कनेक्शन धारकास दर प्रति हजार लिटर्स करीता १५०/- प्रमाणे ठराव पारीत झालेला असून उक्त प्रमाणे कार्यवाही कार्यरथ आहेत.

येणे प्रमाणे अहवाल सविनय सादर.

यावर पाणीपुरवठा लिपीक श्री.कलोशिया यांचेकडुन फेरसादर रिपोर्ट की, पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने मा.शासनाने ठरवुन दिलेल्या मार्गदर्शक पध्दतीचा अवलंब करुन म.न.पास पाणी निर्मितीकामी अपेक्षित खर्च व पाणीपट्टी पाणी विक्री मधुन अपेक्षित याचा नफा-तोटा संतुलन ठेवण्ासह सन २००८-२०१० मध्ये AG ऑडीट यांचे लेखापरिक्षाणातील लेखा आक्षेपानुसार घरगुती, व्यापारी व औद्योगिक पाणी पट्टीमध्ये दरवाढ प्रस्तावित करण्यांत आलेली. होती. परंतु म.न.पा महासभा ठराव क्रं. ६० दिनांक २९/०३/२०१६ अन्वये पारीत ठरावानुसार प्रस्तावित पैकी व्यापारी व औद्योगिक पाणीपट्टी / दरामध्ये वाढ करण्यांत आलेली आहे. त्यामध्ये मुख्यजलवाहीनी वरील पाणी ग्राहकांचा समावेश आहे.

येणेप्रमाणे अहवाल मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालान्वये सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, संपूर्ण नस्तीसह व आलेल्या शिफारशीसह महासभेपुढे निर्णयास्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, विळद घाट अहमदनगर यांचे १] संचालक,आय.बी.एम.आर.डी., २] प्राचार्य,अभियांत्रिकी महाविदयालय, ३] प्राचार्य,औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय, व ४] प्राचार्य डॉ.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज, या सर्व संस्थाना अहमदनगर महानगरपालिकेकडून पाणी नळ कनेक्शन घेतलेले असून रू.८०/- प्रति घन मिटर दराप्रमाणे पाणी पुरवठा केला जात होता. परंतु आपले कार्यालयाकडून दि.१/०४/२०१७ रोजी पत्र पाठवून अचानक दि.०१/०४/२०१६ ते जानेवारी २०१७ या कालावधी करिता रू.१५०/- प्रति घन मिटर या दराने पूर्वलक्षी प्रभावाने बीलाची आकारणी करून मागणी केलेली आहे.

**मा.महापौर साहेब :-** सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार हद्दीबाहेर दुप्पट दराने आकारणी करण्यांत येते. रु.८०/- प्रमाणे त्यांनी पैसे भरले आहेत.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मा.महासभा क्र.०६ प्रस्ताव क्र. ६० दि. २९/०३/२०१६ अन्वये पारीत ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेकडून वाणिज्य वापर व औद्योगिक वापर पाणी ग्राहकांना एप्रिल २०१६ पासून पाणी पट्टी दर वाढ लागू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये वरील ग्राहकांचा समावेश आहे. सदर दरवाढ ठरावाची जानेवारी २०१७ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार वरिल पाणी ग्राहकांना वाढीव दराने पाणीपटटीची बीले देण्यात आलेले आहेत. [एप्रिल २०१६ पासून फरकासह रक्कम भरणे बाबत] संस्थेकडे ३० लाख रुपये थकबाकी प्रलंबीत दिसते.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कोर्टात विषय आहे. आयुक्तांनी त्यांना बोलावून तडजोड करावी. प्रशासनाच्या टिप्पणीनुसार करणार का. एकतर दिवाबत्तीस पैसे नाही. लाईटबील भरायला पैसे नाही. मग दर कमी करायचे का ?आहे त्याच दराने करायचे . डायरेक्ट लाईनवर किती कनेक्शन दिले आहेत.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** डायरेक्ट लाईनवरुन २७ कनेक्शन दिले आहेत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** दोन इंची कनेक्शनने ग्रामपंचायतींना २४ तास पाणी चालू आहे. एक रुपया सुध्दा ते पालिकेत भरीत नाही. त्यांचेकडे कोटयावधी रुपयांची बाकी आहे.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** तत्कालीन नगरपालिका असतांना मा.महासभेने ठराव करुन कनेक्शन दिले आहे.

**मा.महापौर साहेब :-** त्या गावांची जिल्हा परिषदेकडून त्या गावाला मिळणा-या निधीतून वसुली करायला लावू.

**मा.श्री.अविनाश घुले :-** नगरोत्थान कडून जो निधी ग्रामपंचायतीला येतो त्यामधून वसुल करता येईल.

**मा.महापौर साहेब :-** आपल्याला किती ते परवडेल.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** सभागृहाचे मत घ्यावे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** विखे पाटील फौंडेशनचे अनेक शिक्षक पिण्याच्या पाण्याची नविन लाईनचे कामकाज चालू आहे त्या लाईनवर काम करत होते. त्याचा विचार करून निर्णय घ्यावा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** वसुली कधीपासून करणार

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** ऑडीटरचा काही आक्षेप येणार नाही अशा दृष्टीने निर्णय घ्यावा. रु.१०० प्रमाणे मान्यता देण्यांत यावी.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** विषयातील मध्य साधुन निर्णय घेण्यांत यावा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** बाकीच्या कनेक्शनची कोटीतील थकबाकी वसुली करावी. १०० रुपये आकारणी करावी. १०० रुपये मान्य. २३ कनेक्शन बाबत वसुली होत नसेल तर कट करा. प्रशासन वारंवार पत्र व्यवहार करतो. प्रतिसाद देत नाही. कारवाई करा. मागील पण १०० रुपयांप्रमाणे वसुली करण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** आपली योजना पुर्ण होवू द्या मग कारवाई करा.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** ठरावा पासुन वसुल करणार.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** शैक्षणिक संस्था पवित्र मंदिर आहे. काहीतरी तडजोड करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कोर्टातुन केस मागे घ्यायला सांगा.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** वृत्तपत्रात नांदगांव मध्ये लाईन दुरुस्ती मुळे गोरगरीबांचे आठ कुटुंबांचे अन्न धान्य, जीवनावश्यक वस्तु वाहून गेल्याची बातमी वाचनात आली. मी मागील वेळी सुध्दा सूचना मांडली होती. एवढयात वारंवार लाईन फुटते. त्यामुळे वारंवार पाणीपुरवठा विस्कळीत होतो. नागरिकांच्या रोषास आम्हाला सामोरे जावे लागते. तातडीचे कामासाठी एक एमर्जन्सी टीम तयार करण्यांस सांगीतले ती टीम दिवसरात्र काम करील. एक फोर्स तयार करावा ज्यामुळे तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करता येईल.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मा.खा.सुजयजी विखे यांनी खुप मोठी मदत केली आहे. विखे फौंडेशनला जास्त दराने पाण्याची आकारणी केली आहे. थकीत खुप रक्कम अडकलेली आहे. प्रशासनाने पॉझीटीव्ह ॲटीटयुड ठेवून मधला मार्ग काढला तर २.५ ते ३ कोटी वसुल होतील. मध्यमार्ग काढुन निर्णय घ्यावा.

**मा.महापौर साहेब :-** पाईप लाईन फुटल्यानंतर एक तासात दुरुस्तीची व्यवस्था केली.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** ड्रेनेजचे समस्ये बाबत बोलतो अमृत २ रा टप्प्यात मुकुंदनगरचे अमृत योजना, भुयारी गटार योजना मधुन नांव वगळण्यांत आले.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** मुकुंदनगरचे नांव आहे.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** फेज-२ टाकीचे काम प्रलंबीत आहे.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :-** अमृत योजना पुर्ण झाली की टाकी भरता येईल. ३७ ठिकाणी शेतक-यांच्या अडचणी होत्या मा.महापौरांनी समक्ष भेटुन पाठपुरावा केला त्यामुळे ब-यापैकी प्रश्न मार्गी लागला तातडीने काम करण्यांत येईल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** फेज-२ चा प्रश्न इथे मांडला. मा.महापौर यांनी वेळेचे बंधन न पाळता योजनेवरील कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी दिल्या प्रश्न सोडवले त्यांचा मोबदला मिळवून दिला मिटींगमध्ये या विषयाला प्राधान्य दिले. १-२ महिन्यात योजना मार्गी लागेल. महापौर साहेबांचे मी सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. माजी स्थायी समिती सभापती यांनीही प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केला.त्यांचेही अभिनंदन करतो.

**मा.आयुक्त साहेब :-** काही घटना सांगणे गरजेचे आहे. महापौर यांनी व्यक्तीच्या पलीकडे जावून काम केले आहे. रेल्वे क्रॉसींग साठी असेल, सोनवणे, काळे यांनी पाईपलाईनचे काम अडवले होते, कोर्टाचे काय करायचे असा प्रश्न होता. महापौर साहेबांनी स्वतः झळ सोसून काम केले ते कौतुकास्पद आहे. काळे यांनी त्यांची जागा भाडयाने दिली होती. आम्ही साईटवर गेलो ते काम करु देत नाही कोर्टाचा विषय संपला आहे. आमच टार्गेट रेल्वे क्रॉसींगचा आहे. रेल्वे अधिका-यांशी बोललो रेल्वे विभागाकडील रजिष्टर कॉन्ट्रॅक्टर पाहीजे. उद्या संध्याकाळ पर्यंत क्रॉसींगचे काम होईल. जुन अखेर पाणी आणायचा आमचा प्रयत्न आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** महापौरांनी प्रयत्न करुन काम करुन घेतले. शिवसेनेच्या वतीने महापौर आयुक्त यांचे अभिनंदनचा ठराव मांडतो.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** अमृत योजनेसाठी सर्वांनी कष्ट घेतले. मा.महापौरांच्या घरी २ कार्य होते ते बाजुला ठेवून आपल्याला विळदला जावे लागेल असे म्हणायचे इतके कामात वाहुन घेतले. त्यांचे काही नुकसानही झाले असेल. ९९% पाणी आलेच आहे. काही गोष्टीचा त्याग केला. सभागृहाच्या वतीने त्यांचा अभिनंदनाचा एकमुखी ठराव करावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** महापौरांचे अभिनंदनाचा ठराव सर्वांनी केला. ख-या अर्थाने महापौरांचे कौतुक करतो या उन्हाळयात पाणी आणू अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे आज तरी पाणी येणार पुढचे उन्हाळे पाण्याखाली जाणार. सर्व प्रशासन, महापौर टिमवर्कच्या माध्यमातुन शहराचे अनेक प्रश्न सुटतात. त्याबद्दल आपले आभार.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** पाणी प्रश्नाबाबत सर्व लोक चांगले बोलले मा.महापौर यांनी गेल्या अडीच वर्षात अनेक प्रयत्न केले. वैयक्तीक शहराचा प्रश्न घरचा समजून काम केले त्याबद्दल मी भाजपा शहराध्यक्ष या नात्याने धन्यवाद देतो. अत्यंत चांगले काम कुठलाही मोठेपणा न दाखवता काम केले त्या बद्दल खुप खुप धन्यवाद.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** एक जनरल बोर्ड लाईव्ह घ्यावा दोन्ही बाजू त्या दिवशी मांडू. संग्रामभैय्या नंतर काहीच त्रास न झालेला माणूस महापौर आहात. ऑफ लाईन सभा घ्यावी.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मा.खा.सुजयजी विखे यांनी खुप मोठी मदत केली आहे. विखे फौंडेशनला जास्त दराने पाण्याची आकारणी केली आहे. थकीत खुप रक्कम अडकलेली आहे. प्रशासनाने पॉझीटीव्ह ॲटीटयुड ठेवून मधला मार्ग काढला तर २.५ ते ३ कोटी वसुल होतील. मध्यमार्ग काढुन निर्णय घ्यावा. मराठा समाजासाठी कृषी विभागाची जागा दिली पण कागदपत्राची पूर्तता झाली नाही. नालेगांव स.नं.२२०, २२१ मधील मोकळी जागा सकल मराठा समाज, अहमदनगर या सामाजिक संस्थेस समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी मिळणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देवून हा विषय मंजूर करावा.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** भैय्या गंधे यांनी जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.श्रीमती.सुरेखा कदम :-** अमृत योजना पूर्णत्वाकडे जात आहे. तुमचे व आयुक्त साहेबांचे मनापासून आभार मानते. लवकरात लवकर योजना पूर्ण झाली तर पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. उपनगरामध्ये विद्युत दाहीनी चालू करावी. उपनगरात सोय होणार आहे.

**मा.महापौर साहेब :-** चांगला विषय आहे.

**मा.श्रीमती.सुरेखा कदम :-** महानगरपालिकेच्या शाळा बंद आहेत. विद्यार्थ्यांचे नुकसान होते ऑनलाईन शिक्षण चालू करावे. एक मिटींग घेवून लवकर कार्यवाही करावी. पहिल्या टप्प्यात ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण ऑनलाईन चालू करावे.

**मा.महापौर साहेब :-** पवार शिक्षणाधिका-यांशी चर्चा करुन मिटींग लावतो. १-२ दिवसात विषय मार्गी लावू.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेली चर्चेनुसार पद्मश्री.डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन विळद घाट अहमदनगर यांचे संस्थेस पाणी बील आकारणी कमी करण्याच्या मागणी व सभागृहात मा.सदस्यांनी दर कमी

करून थकीत रक्कम वसुल होण्याच्या दृष्टिने पद्मश्री.डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन विळद घाट अहमदनगर या संस्थेस रक्कम रुपये १००/- प्रति घन मीटर या दराने पाणी बील आकारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर पाणीबील आकारणी दरवाढ झालेल्या तारखेपासुन (दिनांक ०१/०४/२०१६ पासुन) वसुल करण्यांत यावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.महेंद्र (भैय्या) मोहिनीराज गंधे,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१** **प्रस्ताव क्रमांक : ०५** **दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.प्रसाद बाळु उमाप, सफाई कामगार यांनी सादर केलेले वैद्यकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १. म.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र २०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावी २, मंत्रालय मुंबई, दिनांक १६ मार्च २०१६

२. मा.महासभा ठराव क्रमांक ३०, दिनांक ०७/१२/२०१६.

फेरसादर,

१ कर्मचा-याचे नांव : श्री.प्रसाद बाळु उमाप
२ रुग्णाचे नांव : स्वत:
३ कर्मचा-याशी नाते : --
४ पदनाम : सफाई कामगार
५ हॉस्पीटलचे नांव : सह्याद्री हॉस्पीटल, पुणे
६ आंतररुग्ण कालवधी : २५/०२/२०१९ ते ०९/०३/२०१९

अ)

| औषधाचे खर्च | |
|---|---|
| एकुण खर्च | एकुण खर्चाच्या ९०% |
| १९९२४९/- | १,७९,३२४/- |

ब)

| वास्तव्याचा खर्च | वास्तव्याचा खर्चाच्या ९०% |
|---|---|
| एकुण खर्च ५२६६००/- | ४,७३,९४०/- |
| सर्व सामान्य कक्ष १०८००/- | १०,२६०/- (९५%) |
| अतिदक्षता विभाग १९८००/- | १९८००/- (१००%) |
| एकुण | ५,०४,०००/- |

तरी संदर्भीय क्रमांक ३ अन्वये सदरचे देयक त्रुटींची पुर्तता करुन तपासणी साठी सादर करीत असुन सदर देयकाची तपासणी करुन एकुण अक्षरी रक्कम रु. सहा लाख त्र्याऐंशी हजार तिनशे चोवीस मात्र

संबंधितास अदा करणेस हरकत नाही. (६,८३,३२४/-)

एकुण खर्च = अ + ब

६,८३,३२४ = १,७९,३२४ + ५,०४,०००

इतकी रक्कम मंजुरीस मान्यतेस्तव सादर.

लेखाशिर्ष :- वैद्यकीय प्रतीपुर्ती खर्च ८००००००/- (सन २०२०-२०२१)

| | |
|---|---|
| तरतुद रक्कम | :- ८००००००/- |
| आत्तापर्यंत झालेला खर्च | :- ६००५१७/- |
| उपलब्ध शिल्लक | :- ७३९९४८३/- |
| अपेक्षित खर्च | :- ६,८३,३२४/- |

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.सहाय्यक आयुक्त यांच्या प्रस्तावित अ नुसार व महासभा ठराव क्रमांक ९ दिनांक २६/०५/२०१२ चे ठरावानुसार वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक महासभेपुढे ठेवणे आवश्यक ठरेल.

यावर उपायुक्त (सा) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

चर्चा :-

मा.श्री.महेंद्र गंधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. माझ्या प्रभागामध्ये योगा हॉल बांधण्यांत येत आहे. सदरच्या हॉलचा वापर गोरगरीब महिला गृहउद्योगासाठी होणार आहे. तसेच परिसरातील नागरिकांना मोफत योगा शिकविले जाईल. महिला गृहउद्योगामधून गरीब महिला याठिकाणी पापड, लोणचे, चटण्या, कुरडई अशा घरगुती खाद्य पदार्थ तयार करतात. त्यांना रोजगार उपलब्ध होईल. देशातील नामवंत विचारवंताचे व्याख्याने विनामूल्य ही संस्था देणार आहे. याचे कामकाज कलिंगा ग्रामोदय संस्था, सावेडी, अहमदनगर हे विनामूल्य करणार आहेत. तसेच ही संस्था या इमारतीचे देखभाल दुरुस्ती देखील करणार आहेत. या संस्थेला सदर इमारत देखभाल दुरुस्तीसाठी देणेत यावी. सदर संस्थेस ३० वर्षाच्या कराराने सदर इमारत देखभालीसाठी देण्यांत यावी. तसेच महानगरपालिकेचे सावेडी येथील प्रमोदजी महाजन स्पर्धा परीक्षा केंद्र, जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर या संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी देण्यांत यावे. ही संस्था शहरातील विद्यार्थ्यांना विनामूल्य अभ्यासिका उपलब्ध करुन देणार आहेत. या अभ्यासिकेच्या माध्यमातुन शहरातील हुशार विद्यार्थी राज्य पातळीवर उच्च शिक्षीत होवू शकतात.

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर. श्री.प्रसाद बाळू उमाप, यांचे वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्ती देयक देण्यास ही सभा मान्यता देत आहे. महेंद्र गंधे नगरसेवक यांनी त्यांच्या प्रभागात योगा हॉल कलिंगा ग्रामोदय संस्था, सावेडी यांना देण्याबाबत सूचना मांडली त्यास परवानगी देण्यांत येत आहे. जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर यांना प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा केंद्र विद्यार्थ्यांना विनामूल्य शिकविण्यासाठी देण्यांत यावे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी श्री.प्रसाद बाळू उमाप, सफाई कामगार याच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावास व सदरच्या खर्चास ही

सभा मान्यता देत आहे. सदरच्या प्रकरणात अंतिम कार्यवाही करतांना मा.आयुक्त यांची प्रतिस्वाक्षरी घेण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

प्रभाग क्रमांक ५ मधील योगा हॉल कलिंगा ग्रामोदय संस्था, सावेडी यांना ३० वर्षाच्या कराराने देण्यांत यावे. सदर संस्था गोरगरीब महिलांसाठी रोजगाराचे कार्य करणार आहेत तसेच परिसरातील नागरिकांना विनामूल्य योगाचे प्रशिक्षण व देशातील नामवंत विचारवंतांचे समाजाकरीता प्रबोधनपर व्याख्याने देणार आहेत. त्यांचे हे योगदान पाहता व सदर उपक्रम हे सामाजिक असून महिला सक्षमीकरण आणि महिलांचे आरोग्य विषय असल्या कारणाने समाजाचे स्वास्थ यातून घडणार आहे. या दृष्टिने सदर संस्थेस कोणत्याही प्रकारचे कर अथवा भाडे आकारणी करण्यात येवू नये. सदरचा हॉल देखभाल दुरुस्तीकरीता विनामूल्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर संस्था इमारतीचे दुरुस्ती तद्नुषंगीक खर्च करणार आहे. प्रशासनाने कार्यालयीन सोपस्कार करुन, योग्य ती कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर हि संस्था शहरातील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासिका विनामूल्य उपलब्ध करुन देणार आहेत. त्यांचे हे कार्य पाहता त्यांना प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा केंद्र विनामूल्य देखभाल दुरुस्तीसाठी देण्यांस ही सभा मान्यता देत आहे. सदर संस्था इमारतीचे दुरुस्ती तद्नुषंगीक खर्च करणार आहे. याबाबत प्रशासनाने कार्यालयीन सोपस्कार करुन योग्य ती कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.महेंद्र (भैय्या) मोहिनीराज गंधे,

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१ प्रस्ताव क्रमांक : ०६ दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** ई-निविदा क्र.१४०२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नंबर २१३/२, २०६/१ब, १अ, १ब/२/१ या ओपन स्पेस मध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधावे या कामाची अनामत रिफंड करणेसाठी मा.महासभेकडे ठराव करणेसाठी प्रस्ताव.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

| अ.नं. | तपशिल | शेरा | | |
|---|---|---|---|---|
| १ | कामाचे नांव | ई-निविदा क्र.-१४०२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नंबर २१३/२, २०६/१ब, १अ/१ब/२/१ या ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे | | |
| २ | ठेकेदाराचे नांव | रोहन एस.मांडे, अहमदनगर | | |
| ३ | कार्यारंभआदेश क्र. | | जा.क्र.५३८ दि.१०/१०/२०१६ | |
| ४ | अनामत रक्कम जमा करण्याचा तपशील | FDR ने भरणा | FI०४/८४५२ | रु.७५,०००/- |
| | | बिलातुन कपात | First RA | रु.१७,४७९/- |
| | | बिलातुन कपात | २ nd RA | रु.२९,६०९/- |
| | | बिलातुन कपात | ३ rd RA | रु.२८,९२८/- |
| | | बिलातुन कपात | ४ th RA | रु.१९,०५६/- |
| | | | एकुण | १,७०,०७२ |
| ५ | काम मुदतीत पुर्ण झाले ? | होय / नाही | | |
| ६ | अ.क्र.४ नाही असल्यास मुदतवाढ दिली होती काय ? | होय / नाही | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | एक ते चार देयकाची रक्कम तारीख इत्यादी | | रुपये | ६,९९,१६८+११८४३६९+११५७११७+७८८१३३=३८,२८,७८७<br><br>दिनांक ०५/०२/२०२० |
| ८ | काम सुस्थितीत आहे ? | | | होय / नाही |
| ९ | काम पुर्ण झाल्याची तारीख | | दिनांक | ०२/०६/२०१८ |
| १० | ठेकेदाराकडुन काही वसुली प्रलंबित आहे ? (असल्यास तपशिल देणे) | | | होय / नाही |
| ११ | ठेकेदाराच्या अर्जाची तारीख | | दिनांक | १५/०७/२०२० |
| १२ | अभिप्राय | | | आज दि.२८/०९/२०२० समक्ष साईटवर पहाणी केली असता काम सुस्थितीत आहे. सदरचे काम पुर्ण होउन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. सदर कामांचा दोषादायित्व कालावधी सहा महिने इतका आहे. तरी ठेकेदाराने भरलेली व बिलातुन कपात केलेली डिपॉझिट परतावा करणेस हरकत नाही. मा.लेखापरिक्षण औरंगाबाद यांचे सन २०१६-२०१७ अखेर लेखापरिक्षण झालेले आहे. सदरचे काम सन २०१५-२०१६ वर्षातील असून लेखापरिक्षण होणे बाकी आहे. सबब सध्या लेखापरिक्षणांतर्गत वसुली नाही. |
| | | | | |

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, १) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील प्रकरण २० नियम २९९ अन्वये परतावा योग्य असलेल्या ठेवीचा तीन वर्षे पूर्ण लेखांकन वर्षाकरीता दावा सांगण्यात

आला नाही तर अशा अनामत रक्कमा व्यपगत होतील आणि व्यपगत अनामत रक्कमा खाली शिर्षाखाली नगरपालिका निधीत वर्ग होतील. सदरच्या ठेवी मा.महासभा मंजूरी शिवाय परतफेड करता येणार नाही.

२) तसेच ई-निविदा १४०२ मध्ये सदर कामाचा दोषदायीत्व कालावधी किती दिवसाचा आहे याची खात्री करुन पूर्ततासह फेरसादर करावे.

यावर उपअभियंता यांचेकडून फेररिपोर्ट सादर की, सोबत मा.महासभा ठराव /प्रस्ताव क्र.१९ दिनांक ३१/०८/२०१५ अन्वये सिक्युरीटी डिपॉझिट (एफ.डी.आर) रोख भरलेले व बिलातुन कपात केलेली रक्कम रिफंड देणेबाबत ठराव जोडलेला आहे. मान्यतेस्तव सादर. तसेच दोष दायित्व कालावधी सहा महिन्याचा आहे. दोषदायित्व कालावधी हा काम पुर्ण दिनांकापासुन धरण्यांत येतो सि.डि.रिफंड करण्यास हरकत नाही.

यावर शहर अभियंता बांधकाम विभाग यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मा.महासभा ठराव/प्रस्ताव क्र.१९ दिनांक ३१/०७/२०१५ च्या ठरावामध्ये मजूर संस्थेच्या नावे आहे त्यामध्ये प्रस्तावात नमूद केलेल्या निविदाकाराचा उल्लेख केला नाही. उप-अभियंता यांनी केलेला फेरसादर खुलाशाप्रमाणे विभागाने खात्री करुन उचित निर्णय घ्यावा.

यावर उपअभियंता यांचेकडून फेरसादर रिपोर्ट की, विषयांकित कामासाठी ठेकेदाराने अनामत रक्कमेपोटी भरलेली रक्कम व बिलातील कपात केलेल्या रक्क्मा तीन वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला असल्याने सदर रक्कम व्यपगत झालेली आहे. सदर रक्कम रिफंड करण्यासाठी मा.महासभेची आवश्यकता आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेस निर्णयास्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.सादर, वरिल क प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.सहा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, उपअभियंता यांचे अभिप्रायानुसार मा.महासभेपुढे ठेवणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, क  मध्ये नमुद केल्यानुसार मा.महासभेकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर इतरही ठेकेदार संस्थेचे फॉरफिट झालेले अनामत रक्कम अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर आयुर्वेद परिचय केंद्र बांधावे या कामाची अनामत रक्कम अदा करण्यात यावी व अंबादास रामदास चौधरी, ए.जी.वाबळे, श्री.शहानवाज शेख, शिव शिव मजूर संस्था, श्रध्दा मजूर संस्था, साथी साकळाई देवी मजूर सहकारी संस्था, सह्याद्री मजूर सह.संस्था, विकास मजूर सहकारी संस्था,

शिवप्रसाद मजूर सहकारी संस्था, दत्ताराम कैकाडी मजूर सहकारी संस्था, काशीविश्वेश्वर मजूर सहकारी संस्था, रुद्रा मजूर सहकारी संस्था, श्री.राजु लोणकर, मे.ए.सी.कोठारी यांचे नांवे असलेल्या ई निविदा क्रमांक १४१३, १४१४, १३८२ ,११३३ ,१२३८ ,११३४,१२२८, १४१५, १३८३, ७०७ कामांची फॉरफिट झालेली अनामत रक्कम तसेच इतर कामाच्या ठेवी व इतर कामाची फॉरफिट झालेली रक्कम अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१**  **प्रस्ताव क्रमांक : ०७**  **दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट दुरुस्तीकरीता विद्युत साहित्य बसविणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई जा.क्र.मनपा-२०१९/प्र.क्र.५३(१)/नवि-१६ दिनांक ०८/०३/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यांत येते की, संदर्भीय पत्रान्वये अहमदनगर महानगरपालिकेस विविध ठिकाणी असलेल्या स्ट्रीट लाईट दुरुस्त करणेकरीता विद्युत साहित्य बसविणेबाबत एकुण ५० लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले आहे. सदर प्राप्त झालेल्या अनुदानाचा विनीयोग करणे करीता विद्युत विभागा अंतर्गत खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | ढोबळ अंदाजित रक्कम | कामाची आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | शहरामध्ये एकुण मनपाच्या १९० वीज कनेक्शनच्या ठिकाणी मीटर बॉक्स बसविणे. | ८५००००/- | अहमदनगर मनपा हद्दीमध्ये एकुण १७० थ्री फेज कनेक्शन व २० सिंगल फेज कनेक्शन आहे. याठिकाणी मीटर बॉक्सला कवर नसल्याने मोठा अपघात होवून जिवित हानी होण्याची शक्यता आहे. तसेच वीज चोरी होण्याची शक्यता आहे. |
| २ | स्ट्रीट लाईट चालू बंद करणेकरीता सिंगल फेज व थ्री फेज टायमर बसविणे | रु.२८७००००/- | सद्यस्थितीत पथदिवे मनपाच्या मनुष्यबळाव्दारे चालू बंद केले जाते. मनपाच्या विद्युत विभागाकडे अपूरा मनुष्यबळ असल्याने विद्युत देखभाल दुरुस्तीकरीता कर्मचारी अपुरे पडत आहे. टायमर बसविल्याने वीज बीलात देखील बचत होणार आहे. |
| ३ | कुष्ठधाम रोड येथे नवीन पोल बसविणे व जुने पोल दुरुस्त करणे | रु.४००००० | सदर ठिकाणच्या रस्त्याचे नूतनीकरणाचे काम चालू असल्याने सदर ठिकाणी नवीन पोल बसविणे व जूने पोल दुरुस्त करणे. |
| ४ | शहरातील संपूर्ण पथदिव्यांना पेंटींग करुन त्यावर नंबर टाकणे. | रु.८८००००/- | सद्यस्थितीत शहरातील बरेचशे पोल मेंटेनन्स अभावी सस्टींग होत आहे. व तसेच पोल नंबर नसल्यामुळे एकूण पोल संख्याच्या सर्वेक्षणाबाबत अडचणी येत आहे. त्यामुळे सर्व पोल पेंटींग करुन नंबर टाकणे आवश्यक आहे. |

त्यानुसार वरील प्रमाणे सर्व कामे अत्यंत आवश्यक आहेत. तरी वरील सर्व कामे संदर्भीय प्राप्त झालेल्या अनुदानातून करुन होणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

यावर विद्युत विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी असे.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, G.B. समोर ठेवण्यासाठी मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

चर्चा :-

मा.श्रीमती.आशा कराळे :- इलेक्ट्रीक साहित्य वॉर्ड क्रमांक ५,६ व ९ करीता वापरण्यांत यावे.

मा.श्रीमती.सोनाबाई शिंदे :- कुष्ठधाम रोड येथे रस्त्याचे काम चालू असल्याने नवीन पोल बसविणे व जुने पोल दुरुस्त करणेसाठी रक्कम रु.४ लक्षची तरतुद करण्यांत यावी.

मा.महापौर साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक ५,६ व ९ मध्ये विद्युत साहित्य खरेदी करणे व इलेक्ट्रीक मीटरचे बॉक्स बसविणेची कार्यवाही करण्यांत यावी.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्ट्रीट लाईट दुरुस्ती करणेकरीता विद्युत साहित्य खरेदीसाठी ५० लक्ष इतके अनुदानातुन शहरामध्ये एकुण महानगरपालिकेच्या १९० वीज कनेक्शनच्या ठिकाणी मीटर बॉक्स बसविणेसाठी रक्कम रु.८,५०,०००/- इतकी रक्कम वापरण्यांत यावी. प्रभाग क्रमांक ५, ६ व ९ मध्ये स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्तीसाठी, विद्युत साहित्य खरेदी करणेसाठी रक्कम रुपये ११,५०,०००/- व कुष्ठधाम रोड येथे नवीन पोल बसविणे व जुने पोल दुरुस्त करणेकरीता रक्कम रु.४,००,०००/- व प्रभाग क्र. ५,६ व ९ मधील आवश्यक त्या ठिकाणी विद्युत पोल उभे करणेसाठी रक्कम रु.२६,००,००० ची तरतुद वापरणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे

अनुमोदक :- मा.श्रीमती.सोनाबाई तायगा शिंदे,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१ प्रस्ताव क्रमांक : ०८ दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** नालेगांव स.नं.२२०, २२१ मधील मोकळी जागा सकल मराठा समाज, अहमदनगर या सामाजिक संस्थेस समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी मिळणेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** श्री.चंद्रकांत गाडे अध्यक्ष, सकल मराठा समाज, अहमदनगर यांचा दिनांक २५/०५/२०२१ रोजीचा मा.महापौर यांना उद्देशुन अर्ज.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय अर्जान्वये श्री.चंद्रकांत गाडे अध्यक्ष, सकल मराठा समाज अहमदनगर यांनी नालेगांव स.नं.२२०,२२१/१ या जमिनीच्या रेखांकनातील जागा मराठा समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी या वापरासाठी विकसित करणेस परवानगी मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे.

नालेगांव स.नं.२२०,२२१ ही जमिन एकुण क्षेत्र ९.१४ हेक्टर (२२.८५ एकर) एवढया क्षेत्राची असुन ही जमिन तत्कालीन नगरपरिषदेने खरेदी केलेली असुन सन १९९९ साली महानगरपालिका हद्दीत सामील झालेली आहे. सिना नदीच्या पश्चिमेकडे नगर-निंबळक रोड या १५.०० मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या दोन्ही बाजुला ही जमिन आहे. एकुण २२.८५ एकर क्षेत्र पै काही क्षेत्रावर विविध प्रकारचे आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. व या जमिनीवर खालील प्रमाणे वापर देखील चालू आहे.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य घरकुल योजना एकुण क्षेत्र ८४.०० आर.
२) इंदीराप्रणित विडी कामगार योजनेसाठी शासनाचे मान्यतेने ८०.०० आर क्षेत्रावर रहीवास कारणासाठी रेखांकन मंजूर आहे.
३) आरक्षण क्रमांक २९४ गार्डन एकुण क्षेत्र ५४ आर.
४) आरक्षण क्र. २९६ दफनभुमी आरक्षीत त्यापैकी ४०.०० आर गोसावी समाज दफनभुमी, १.२० हेक्टर ख्रिश्चन समाज दफनभुमी व ०.८० आर बेवारस प्रेतासाठी दफनभुमी.
५) आरक्षण क्रमांक २९८ एकुण क्षेत्र १.४१ हेक्टर दफनभमी.
६) आरक्षण क्रमांक २९५ म्युनिसिपल परपझ आरक्षण.
७) आरक्षण क्रमांक २९७ म्युनिसिपल परपझ आरक्षण.
८) एकुण क्षेत्र ८० आर महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांना खरेदीने दिलेले आहे.

असे एकुण क्षेत्रफळाचा वापर चालू असुन या जमिनीमधुन १५.०० मी व १८.०० मी.रुंद विकास योजना रस्ता जात आहे. सध्या विज महामंडळाच्या सबस्टेशनच्या पुर्वेला ०.५० आर व पश्चिमेस ०.५०आर असे एकुण १ हेक्टर क्षेत्र खुले आहे. सबस्टेशनच्या पुर्वेकडील जमिनीत आरक्षण क्र.२९७ व पश्चिमेकडील जमिनीत आरक्षण क्र २९५ असे दोन्ही ठिकाणी म्युनिसिपल परपझ या कारणासाठी ही जमिन आरक्षीत आहे. शिल्लक असलेली १ हेक्टर जमिन ही नगर-निंबळक रस्त्याच्या उत्तर बाजुला आहे.

आरक्षण क्रमांक २९७ ही जमिन स.नं.२२० (पै) असुन ती कुकडी पाटबंधारे विभागाने निश्चित केलेल्या सीनानदीच्या बहुतांश पुररेषेने बाधीत होत आहे. त्यामुळे आरक्षण क्रमांक २९७ मध्ये बांधकाम योग्य जागा रहात नाही.

सकल मराठा समाजाला ही जागा द्यावयाची असल्यास तीचे भाडे मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीकडुन भाडे निश्चित करुन घ्यावे लागेल.

आरक्षण क्रमांक २९५ मधील निंबळक रोडच्या उत्तरेकडे ०.५० हेक्टर ही जागा सकल मराठा समाज, अहमदनगर यांना भाडे कराराने द्यावयाची झाल्यास त्यावरील आरक्षण क्रमांक २९५ (पै) म्युनिसिपल परपझ हे आरक्षण वगळुन त्याऐवजी त्यांनी मागणी केलेल्या कारणासाठी हे नविन नामानिधान असलेले आरक्षण फेरबदल प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पार पाडुन त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. ही वैधानिक कार्यवाही पुर्ण झालेनंतरच सदरची जमिन सकल मराठा समाज, अहमदनगर यांचेकडे हस्तांतरीत करता येईल.

जागा भाडे कराराने देणे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची वैधानिक कार्यवाही पार पाडणेसाठी सदरचा विषय मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणे योग्य राहील.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मराठा समाजासाठी कृषी विभागाची जागा दिली पण कागदपत्राची पूर्तता झाली नाही. नालेगांव स.नं.२२०, २२१ मधील मोकळी जागा सकल मराठा समाज, अहमदनगर या सामाजिक संस्थेस समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी मिळणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देवून हा विषय मंजूर करावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कदमताई बोलल्या अमृत योजना त्यांच्या काळात आली. मा.कदमताई, मा.महापौर, मा.आमदार, मा.आयुक्त या ठिकाणी या सर्वांचे चांगले काम झाले. मराठा समाजासाठी जी जागा लागते ती कोठे कशी देणार याबाबत माहिती द्यावी.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** नालेगांव स.नं.२२०,२२१ ही जमिन एकुण क्षेत्र ९.१४ हेक्टर (२२.८५ एकर) एवढया क्षेत्राची असुन ही जमिन तत्कालीन नगरपरिषदेने खरेदी केलेली असुन सन १९९९ साली महानगरपालिका हद्दीत सामील झालेली आहे. सिना नदीच्या पश्चिमेकडे नगर-निंबळक रोड या १५.०० मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या दोन्ही बाजुला ही जमिन आहे. एकुण २२.८५ एकर क्षेत्र पै काही क्षेत्रावर विविध प्रकारचे आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. व या जमिनीवर खालील प्रमाणे वापर देखील चालू आहे.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य घरकुल योजना एकुण क्षेत्र ८४.०० आर.
२) इंदीराप्रणित विडी कामगार योजनेसाठी शासनाचे मान्यतेने ८०.०० आर क्षेत्रावर रहीवास कारणासाठी रेखांकन मंजूर आहे.
३) आरक्षण क्रमांक २९४ गार्डन एकुण क्षेत्र ५४ आर.
४) आरक्षण क्र. २९६ दफनभुमी आरक्षीत त्यापैकी ४०.०० आर गोसावी समाज दफनभुमी, १.२० हेक्टर ख्रिश्चन समाज दफनभुमी व ०.८० आर बेवारस प्रेतासाठी दफनभुमी.

५) आरक्षण क्रमांक २९८ एकुण क्षेत्र १.४१ हेक्टर दफनभमी.

६) आरक्षण क्रमांक २९५ म्युनिसिपल परपझ आरक्षण.

७) आरक्षण क्रमांक २९७ म्युनिसिपल परपझ आरक्षण.

८) एकुण क्षेत्र ८० आर महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांना खरेदीने दिलेले आहे.

असे एकुण क्षेत्रफळाचा वापर चालू असुन या जमिनीमधुन १५.०० मी व १८.०० मी.रुंद विकास योजना रस्ता जात आहे. सध्या विज महामंडळाच्या सबस्टेशनच्या पुर्वेला ०.५० आर व पश्चिमेस ०.५०आर असे एकुण १ हेक्टर क्षेत्र खुले आहे. सबस्टेशनच्या पुर्वेकडील जमिनीत आरक्षण क्र.२९७ व पश्चिमेकडील जमिनीत आरक्षण क्र २९५ असे दोन्ही ठिकाणी म्युनिसिपल परपझ या कारणासाठी ही जमिन आरक्षीत आहे. शिल्लक असलेली १ हेक्टर जमिन ही नगर-निंबळक रस्त्याच्या उत्तर बाजुला आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** एकुण जागा किती.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** २२.८५ एकर आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** जी जागा द्यायची त्यावर आरक्षण नाही.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** ही जमिन तत्कालीन नगरपरिषदेने खरेदी केलेली असुन सन १९९९ साली महानगरपालिका हद्दीत सामील झालेली आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ५० गुंठे कशी देणार.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आरक्षण क्रमांक २९५ मधील निंबळक रोडच्या उत्तरेकडे ०.५० हेक्टर ही जागा सकल मराठा समाज, अहमदनगर यांना भाडे कराराने द्यावयाची झाल्यास त्यावरील आरक्षण क्रमांक २९५ (पै) म्युनिसिपल परपझ हे आरक्षण वगळुन त्याऐवजी त्यांनी मागणी केलेल्या कारणासाठी हे नविन नामानिधान असलेले आरक्षण फेरबदल प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पार पाडुन त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. ही वैधानिक कार्यवाही पुर्ण झालेनंतरच सदरची जमिन सकल मराठा समाज, अहमदनगर यांचेकडे हस्तांतरीत करता येईल. दिलेल्या वापरा व्यतिरिक्त वापर करावयाचा असेल तर ॲथॉरिटीला निर्णय घेता येईल.

आरक्षण क्रमांक २९७ ही जमिन स.नं.२२० (पै) असुन ती कुकडी पाटबंधारे विभागाने निश्चित केलेल्या सीनानदीच्या बहुतांश पुररेषेने बाधीत होत आहे. त्यामुळे आरक्षण क्रमांक २९७ मध्ये बांधकाम योग्य जागा रहात नाही.

सकल मराठा समाजाला ही जागा द्यावयाची असल्यास तीचे भाडे मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीकडुन भाडे निश्चित करुन घ्यावे लागेल.

**मा.महापौर साहेब :-** सामाजीक संस्था असेल तर नाममात्र भाडयाने देता येईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ६०-४० च्या अधिकारात देणार का.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** जागेचा वापर म्यु.पल पर्पज साठी करावा लागेल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आयुक्त साहेब ५० गुंठे जागा तुमच्या अधिकारात देणार का.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** म्यु.पल पर्पज व्यतिरिक्त वापर करावयाचा असेल तर ३७ खाली कार्यवाही करावी लागेल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ६०-४० मध्ये ते करता येईल ते करा. पुढच्यासाठी शासनाकडे जावू.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्तांच्या अधिकारात करु ४० टक्के पेक्षा जास्त बांधकाम करावयाचे झाल्यास शासनाकडे जावू.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** नगर कल्याण रोडवरील बायपास चौकास राजमाता जिजाऊ, नगर-पुणे रस्त्यावरील बायपासला असलेला चौकास धर्मवीर संभाजी महाराज नांव देणे. फाईल नगररचना विभागात येवून पडल्या. त्या फाईल पुढे ढकलल्या पाहीजे. असे प्रस्ताव तातडीने घेतले पाहीजे. इतर समाजाचे प्रस्ताव आल्यानंतर कारवाई केली पाहीजे. येणा-या महासभेत विषय पत्रिकेवर हे विषय घेण्यात यावेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** नालेगांव स.नं.२२०,२२१ संदर्भात मराठा समाजाने जागा चंद्रकांत गाडे यांनी मागीतली. महासभेत आपल्याला पीठासीन अधिकारी म्हणून अधिकार आहेत. नगररचना विभागाने व्यवस्थीत खुलासा, प्रस्ताव द्यायला पाहीजे. आम्ही सर्वानुमते ठराव संमत करणार आहोत. जसे छत्रपती संभाजी महाराज पुतळयासाठी अनेक वेळा विषय मांडला ठराव केला आज त्याला अडीच वर्ष झाले. त्याला मुर्त स्वरुप आले नाही. जागा ५० आर. देणार उद्या याचे भविष्य काय आहे ते सांगा. अडकुन पडायच काम करु नका. समाजाची मागणी आली. भरपुर जागा शहरात आहे. क्लीअर जागा द्या. त्रिसदस्यीय समिती आहे. त्याबद्दल दुमत नाही.

**मा.श्री.अविनाश घुले :-** ठराव झाला. इथून पुढे काय ?

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** ॲथॉरिटी आयुक्त साहेबांचे कक्षेत येते. मा.आयुक्त यांचे अधिकाराचा वापर करुन निर्णय घेणार.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** पंपींग स्टेशन जवळ ५ एकर जागा दिली पण त्यात काही अडचणी आल्या तसे होवू नये.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** ३७ ची कारवाई यात करावी लागणार. आरक्षण उठल्या शिवाय होणार नाही. दोन्ही जागा मा.आमदार संग्राम भैय्या साहेबांना दाखविल्या. ३७ प्रमाणे करा मा.आमदार साहेबांनी सांगीतले.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** माझे म्हणणे ६०-४० पहिले करा. नंतर ३७ प्रमाणे करा. आज अहमदनगर शहरात जे प्रमुख रस्ते आहेत त्याला पूर्वी किती मीटर पर्यंत मंजूरी होती. माझे म्हणणे ३७ मीटरला ६ मीटर पर्यंत परवानगी देतो.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** शहरातील रस्ते आपल्या मालकीचे होत नाहीत. तोपर्यंत आपण नाव देवू शकत नाही. नाव द्यायची फाईल आम्ही थांबवली नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आम्ही पूढची महासभा चालू देणार नाही. खाली बसून राहणार या प्रश्नासाठी दोन दिवस द्या.

**मा.श्री.गणेश भोसले :-** हा विषय पॉझिटीव्ह कसा करता येईल ते पहा तुम्ही करा अथवा नका करू आम्ही ते करणार. सामोपचाराने मार्ग काढा.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** मा.महासभेला सर्वोच्च अधिकार आहेत. आयुक्त साहेब कायदेशीर तरतुदी तपासुन निर्णय घेणार कायद्यात बसतो की नाही ते तपासणार सभागृहात ज्या प्रमाणे ठराव होईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.महापौर साहेब :-** जशी रेल्वेला परवानगी आणली तशी आणू.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ६०-४० चा विषय मार्गी लावा.

**मा.महापौर साहेब :-** आता ४०% चालू करणे ३७ चे नंतर करणार असा निर्णय घेवू.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** सकल मराठा समाजाने जी मागणी केली त्या विषयाला उशीर झाला. मा.आमदार संग्राम भैय्या यांच्या प्रयत्नातुन इतर छोटया मोठया समाजाला जागा उपलब्ध करुन दिल्या. वंजारी समाज, नाभिक समाज, परिट समाज, जैन स्थानक, गवळी समाजासाठी जागा उपलब्ध करुन दिल्या. सकल मराठा समाज, अहमदनगर या सामाजिक संस्थेस समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी केलेली जागेची मागणी मान्य करुन सभागृहाने त्यास मान्यता द्यावी. नाममात्र दरामध्ये भाडयाचा ठराव करावा. नाममात्र भाडे आकारले जावे असा ठराव करावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अरुणोदय गोशाळे मार्फत गायीचे संगोपन केले जाते. या संस्थेमार्फत भाकड गायी व दुष्काळ परिस्थीतीमध्ये शेतक-यांच्या गायी संभाळल्या जातात. या संस्थेस दानशूर व्यक्ती मदत करतात. परंतु संस्थेला जागा नसल्यामुळे गायीचे संगोपन करण्यास अडचण येत आहे. संस्थेचे हे कार्य चांगले असल्यामुळे सदर संस्थेसाठी मनपाच्या स.नं. २२०, २२१ मधील निंबळक रोडच्या उत्तर बाजूच्या महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या सब स्टेशन जवळील मोकळी जागा देणे बाबतचा ठराव पारीत करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** सकल मराठा समाज अहमदनगर यांना नालेगांव स.नं. २२०, २२१/१ मधील जागा मा.आयुक्त यांचे अधिकारात जितकी जागा देता येईल त्याबाबत कार्यवाही करावी व उर्वरित जागा कलम ३७ अन्वये फेरबदलासाठी मा.शासनाकडे पाठविणे बाबत कार्यवाही करावी.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सकल मराठा समाज अहमदनगर यांना नालेगांव स.नं.२२०, २२१/१ मधील आरक्षीत असलेल्या या जमिनीच्या ५० आर. जागा मराठा समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी या वापरासाठी विकसित करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर जागेपैकी मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांचे अधिकारात जितकी जागा देता येईल ती कार्यवाही करावी . उर्वरित जागा नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून मा.शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर जागा सामाजिक कार्यासाठी असल्याने नाममात्र भाडे आकारणी करण्यात यावी. व अरुणोदय गोशाळे मार्फत गायीचे संगोपन केले जाते. परंतु संस्थेला जागा नसल्यामुळे गायीचे संगोपन करण्यास अडचण येत आहे. संस्थेचे हे कार्य चांगले असल्यामुळे सदर संस्थेसाठी मनपाच्या स.नं. २२०, २२१ मधील निंबळक रोडच्या उत्तर बाजूच्या महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या सब स्टेशन जवळील मोकळी जागा देण्यांस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे

अनुमोदक :- मा.श्री. संपत विजय बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१** **प्रस्ताव क्रमांक : ०९** **दिनांक:- ११/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मराठी साहित्य परिषद या प्रथितयश संस्थेस मराठी भाषा साहित्य क्षेत्राच्या वृध्दीसाठी सावेडी उपनगर भागातील , नगररचना योजना क्र.४ , अंतिम भुखंड क्र.२७८ या जागेच्या मंजुर रेखांकनातील मधील खुली जागा क्षेत्र ४१८.१७ चौ.मी. या जागेवर मराठी वाचनालय विकसित करणेसाठी परवानगी देणेबाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** श्री.नरेंद्र फिरोदिया, अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, अहमदनगर जिल्हा वाचनालय यांचा दिनांक १५/०४/२०२१ रोजीचा अर्ज.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय अर्जान्वये महाराष्ट्र साहित्य परिषद यांनी नगररचना योजना क्रमांक ४, अंतिम भुखंड क्रमांक २७८ या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा मराठी वाचनालय या वापरासाठी विकसित करणेस परवानगी मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे अभिप्राय खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१) विषयांकित अंतिम भुखंड क्रमांक २७८ या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा क्षेत्र ४१८.१७ चौ.मी इतकी आहे.

२) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक ०२ डिसेंबर २०२० रोजीच्या अधिसुचनेव्दारे अहमदनगर महानगरपालिकेसाठी एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर व लागु केलेली आहे. सदरहु नियमावलीतील नियम क्रमांक ३.४.२ मध्ये खालील तरतुदी समाविष्ठ आहेत.

१) On sanction of the devolop permission, recreational open space shall deem to have vested in the society/association of the residents/occupants. In case such society or association is to be formed, the possession/custody of relational open space shall remain with the Commissioner until such association/society is formed. In case of group housing scheme, if the developer/owner intend to develop such open space for bonfide use of resident, then the commissioner may allow the same while granting the developmanet permission. The recreational open space shall not be sold/ leased out to any other person and it shall not be put to any other user except for the common use of residents/occupants.

२) If the Municipal Commissioner is convinced that there is misuse of open space: in such case the Municipal Commissioner shall take over the land of recreational open space.

३) उक्त नियमावलीतील नियम क्र.३.४.७. नुसार मंजूर रेखांकनातील खूल्या जागेत वाचनालय हा वापर अनुज्ञेय आहे.